# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००९ |
| वर्ष | : | दहावे |
| अंक | : | ११ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १४६**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे
व्ही. पी. एम्.
दिशा
वर्ष दहावे / अंक ११ / ऑक्टोबर २००९

## संपादकीय

## अंधार यात्रेच्या दिशेने

आजच्या आपल्या देशातील सर्वच क्षेत्रांतील परिस्थिती पाहिली की मन विषण्ण होते. आशिया व आफ्रिका खंडातील देश यांतही फारशी चांगली स्थिती नाही. भारताला स्वतंत्र होऊन ६० हून अधिक वर्षे पूर्ण झाली आहेत. स्वातंत्र्याबरोबर अस्तित्वात आलेला भारत हा निधर्मी, प्रजासत्ताक, लोकशाही राष्ट्र म्हणून जन्माला आला. निधर्मी या शब्दाचा अर्थ व्यापक आहे. सर्व धर्म घटकांना समानतेने वागणूक मिळणे यात अपेक्षित आहे. प्रजातंत्र म्हणजे राष्ट्राच्या प्रगतीमध्ये, जडणघडणीमध्ये जे निर्णय होतील त्या निर्णयांच्या प्रक्रियेत प्रजेचा, प्रजेतील सामान्य नागरिकाचा सहभाग व असा सहभाग आणण्याची प्रक्रिया होय. राजेशाही म्हणजे एकांगी, घराणेशाही. परंतु स्वातंत्र्योत्तर कालखंडाचा अभ्यास केल्यास असे दिसते की लोकशाहीचा आधार घेऊन घराणेशाहीच अस्तित्वात आली. ही लोकशाहीची शोकांतिका आहे. भारताचे नेतृत्व करायला आपण गांधी-नेहरू घराण्यांची घराणेशाही मान्य केली.

राजकारणामध्ये स्तुतिपाठकांचा एक नवा वर्ग बनत गेला. साहाजिकच या लाचारांना ते करत असलेल्या स्तुतीची किंमत म्हणून मंत्रिपदे, महामंडळे बहाल करण्यात आली. या क्षेत्रात त्यांची सरदारकी चालू झाली. राज्यांमधील हे सरदार पुढे आपल्या अनुयायांना हाताखालचे सरदार बनवायला लागले. प्रस्थापितांची ही यादी इतकी मोठी झाली की गल्लीपासून दिल्लीपर्यंत सर्व देशात घराणेशाही दृढ झाली. सेवेपेक्षा मेवा काय मिळतो याचाच विचार सुरू झाला.

गुंड, धटिंगण, दरोडेखोर, बदमाश, तडीपार अशी अनेक विशेषणे ज्यांच्या नावामागे लावता येतील अशा सर्वार्थाने लायक नसणाऱ्या लोकांच्या हातात यंत्रणा गेली. ते या यंत्रणेचे चालक बनले. दूरचित्रवाणीवरून, वृत्तपत्रांमधून, सभांमधून प्रसारित होणारी यांची भाषणे ऐकली की निर्लज्जपणाला काही सीमा उरली नाही, याचा प्रत्यय येऊ लागला.

मतदान हे लोकशाहीतील पवित्र कर्तव्य आहे. सद्सद्विवेकबुद्धी व राष्ट्राचे हित डोळ्यांसमोर ठेवून योग्य उमेदवार निवडून द्यायचा असतो. निवडून दिलेल्या अशा उमेदवाराने लोकांच्या अपेक्षेनुसार काम केले नाही तर पाच वर्षांनी नवीन उमेदवार निवडण्याची संधी लोकशाहीत असते. परंतु घराणेशाही दृढ होत गेलेल्या आपल्या लोकशाहीत असे झालेले

(मलपृष्ठ क्र. ३ वर)



# पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावे । तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ।। १ ।।

जे खळांची व्यकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ।।२ ।।

दूरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो जो जे वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।

वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।। ४ ।।

चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव । बोलते ते अर्णव । पीयूषाचे ।। ५ ।।

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ।। ६ ।।

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिही लोकीं ।भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।७ ।।

आणि ग्रंथोपजीविंये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजयें । हो आवें जी ।। ८ ।।

येथ म्हणे विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखया जाला ।। ९ ।।

## ❈ सार्थ पसायदान ❈

आता यावर विश्व स्वरूप, सद्‌गुरु यांनी माझ्या वागयज्ञेकरून संतुष्ट होऊन मजला हा प्रसाद द्यावा, कीं, दुष्टांचा कुटिलपणा जाऊन त्यांना सत्कर्माची प्रीती उत्पन्न होवो; व जीवमात्रांची एकमेकांशी मैत्री वाढो. या सर्व विश्वामधील पापरूपी अंधकार नाहीसा होऊन स्वधर्मरूपी सूर्य उगवून त्याचा प्रकाश होवो आणि प्राणिमात्राच्या ज्या ज्या इच्छा असतील त्या त्या पूर्ण होवोत.

या भूतलावर अखिल मंगलांचा वर्षाव करणाऱ्या भगवत् भक्तांच्या समुदायांची सर्व भूतांना सद्‌भावेकरून सदोदित भेट होवो. ते भक्तजन कसे आहेत, तर चालते बोलते कल्पतरूचे बाग, जिवंत चिंतामणीचे गाव, किंवा अमृताचे चालते बोलते समुद्रच होत. जे कलंकरहित प्रतिचंद्र, संसाररूपी अधंकार दूर करून शांतिसुख देणारे प्रतिसूर्य असे भगवत् भक्त, ते सकल जीवांना प्रिय होवोत.

फार काय मागावे! सर्व त्रैलोक्यसुखाने परिपूर्ण होऊन प्राणिमात्राला हरीचें अखंड भजन करण्याची इच्छा होवो आणि या ग्रंथावरच ज्यांचे उपजीवन आहे, त्यांना इहलोकचे व परलोकचे सुख प्राप्त होवो !

तेव्हा सदगुरू प्रसन्न होऊन म्हणाले की, तुझ्या म्हणण्याप्रमाणे सर्व होईल. असे वरप्रदान मिळाल्याने श्रीज्ञानदेव फार संतोषित झाले.

(अध्याय अठरावा : ओवी क्र. १७९३ ते १८०१)




**वर्ष दहावे/अंक ११ / ऑक्टोबर २००९**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १५ वे / अंक ४ था)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | होमी भाभा बहुआयामी व्यक्तिमत्त्व | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| २) | संधी देणारी गवाक्षे | सौ. विशाखा देशपांडे | ८ |
| ३) | संत कान्होपात्रा | श्री. शं. बा. मठ | ११ |
| ४) | परमेश्वर प्राप्तीचा मार्ग | श्री. यशवंत माने | १४ |
| ५) | आधुनिक कर्मयोगी - पू. पांडुरंगशास्त्री आठवले | श्री. शशिकांत गाणार | १६ |
| ६) | शैक्षणिक ग्रंथालयातील रात्र महाविद्यालयाच्या संदर्भात | प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये | १७ |
| ७) | पुस्तक परिचय १ - मौनीबुवा | प्रा. डॉ. प्रदीप कर्णिक | २० |
| | पुस्तक परिचय २ - जीवनानुभव व्यक्त करणाऱ्या कविता | श्री. दीपक संगीत | २२ |
| | पुस्तक परिचय - ३ ग्रंथसामर्थ्याचा अनोखा अभ्यास : ग्रंथसामर्थ्य | श्री. मोहन पाठक | २४ |
| ८) | साहित्य जगत - ऋग्वेदाचा मराठी शास्त्रीय अनुवाद ग्रंथराज | श्री. शरद जोशी | २६ |
| ९) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | ३२ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

दूरदर्शन, सिनेमे व सवंग नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन, या मासिकात जाहिरात देऊन किंवा लेख पाठवून आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ,**
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

टीप : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) ''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा'' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/– फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, टपाल सूची क्रमांक (पिनकोड नंबर) व दूरध्वनी क्रमांक कळवावा.

# होमी भाभा
# बहुआयामी व्यक्तिमत्व

*डॉ. सुधाकर आगरकर यांनी तयार केलेल्या चित्रपारदर्शिका सादरीकरणातील (slidshow presentation) मजकुराचा हा अनुवाद. याचे दिशातील सादरीकरण चित्रपारदर्शिकांच्या चौकटींच्या स्वरूपातच केले आहे. ३० ऑक्टोबर रोजी भाभांच्या जन्मशताब्दीचे वर्ष पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने हे सादरीकरण देत आहोत. – संपादक*



### *होमी भाभा - निष्णात संशोधक*

- १९०९ साली मुंबई येथे जन्म झालेल्या भाभांचे शिक्षण मुंबई व केंब्रिजमध्ये झाले.
- केंब्रिजच्या विख्यात किंग्ज महाविद्यालयाचे ते विद्यार्थी होते व आपले विद्यावाचस्पती पदवीचे संशोधक त्यांनी तेथूनच केले.
- वैश्विक किरणांचे पदार्थविज्ञान या विषयात त्यांनी संशोधन केले. या विषयात संशोधन कार्य त्यांनी चालू ठेवले असते, तर नोबेल पुरस्कारही त्यांना मिळाला असता.

भाभा : बहुआयामी व्यक्तिमत्त्व



### *होमी भाभा - द्रष्टा वैज्ञानिक*

- अणुऊर्जेची शक्ती १९४५ साली जगाला समजली. तेव्हापासून या शक्तीचा शांततेच्या कार्यासाठी कसा उपयोग करता येईल यासंबंधी ते विचार करू लागले.
- भारत स्वतंत्र होताच त्यांनी तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांना अणुऊर्जा आयोग नेमण्याचे महत्त्व पटवून दिले.
- या कल्पनेला बराच विरोध झाला. आपल्या लोकांना अन्न, शिक्षण अशा सुविधा पुरवण्याचा विचार आपण आधी केला पाहिजे; अणु संशोधनावर खर्च अयोग्य ठरेल असे लोकांचे मत होते.
- असे असले तरी अणुसंशोधनाची उपयुक्तता मनोमन पटल्यामुळे भाभा यांनी आपल्या कल्पनेचा पाठपुरावा केला.

भाभा : बहुआयामी व्यक्तिमत्त्व

सांस्कृतिक वारसा मिळण्याचे एकमेव साधन, म्हणजे मातृभाषा होय!



## *होमी भाभा - द्रष्टा वैज्ञानिक*

- अणुऊर्जा विभागाच्या अखत्यारीत विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती होईल, हे जाणून भाभा यांनी विज्ञान व तंत्रज्ञान संशोधन संस्थेची (CSIR) कल्पना केली.
- अणुऊर्जा विभागाचे आता तीन स्वतंत्र भाग आहेत. बीएआरसी सारखी संशोधन संस्था, इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्र (IGCAR) व न्यूक्लिअर पॉवर कार्पोरेशन लिमिटेड (NPCL) सारखी औद्योगिक संस्था हे ते भाग होत. शिवाय टीआयएफआर (मुंबई) सहा इन्स्टिट्यूट ऑफ न्यूक्लिअर फिजिक्स (कोलकाता), टाटा मेमोरियल (मुंबई), पदार्थविज्ञान संस्था (भुवनेश्वर) इ. यांसारखा अनुदानित संस्था आहेत.

भाभा : बहुआयामी व्यक्तिमत्त्व



## *होमी भाभा - संस्थांचे निर्माते*

- केम्ब्रिजहून परतल्यावर होमी भाभा यांनी बंगालच्या भारतीय विज्ञान संस्थेत नोकरी सुरू केली. संशोधनासाठी लागणाऱ्या सुविधांची उणीव जाणवून ती नोकरी सोडण्याचे त्यांनी ठरवले.
- जे. आर. डी. टाटा यांना त्यांनी हे कळवले; पण टाटा यांनी येथेच राहून आतंरराष्ट्रीय ख्यातीची संस्था उभारण्यासाठी भाभांचे मन वळवले.
- टाटा ट्रस्ट, मुंबई सरकार व केंद्र सरकार यांच्या मदतीने १९४५ मध्ये भाभा 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रीसर्च' ही संस्था निर्माण करू शकले.

भाभा : बहुआयामी व्यक्तिमत्त्व

*एक विचार*

*पाणी अमूल्य आहे; जपून वापरा.*

भाषा हे संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे.



### *होमी भाभा - जातिवंत संघटक*

- टी आय एफ आर व डीएइ यांच्या उभारणीसाठी आव्हान स्वीकारणाऱ्या माणसांची गरज होती. होमी भाभांनी जगभरातून अशी जाणकार, कल्पक माणसे शोधली, त्यांना आंमत्रणे केली व शक्य त्या सर्व सुविधाही पुरवल्या.
- एखादा विभाग सुस्थापित करण्याच्या पारंपरिक पद्धतींपेक्षा व त्यासाठी माणसे नेमण्याच्या पद्धतीपेक्षा भाभा यांनी माणसे ओळखून त्यांच्या भोवती समूहांचे संघटन केले.
- ते नेहमी म्हणत, ''प्रथम कल्पक लोकांना एकत्र येऊन त्यांचे सामूहिक काम सुरू होऊ द्या; इमारती नंतर येतील.''

भाभा : बहुआयामी व्यक्तिमत्त्व



### *होमी भाभा - संवेदनशील प्रशासक*

- १९६० च्या दशकात 'सायरस' अणुभट्टी उभारणीचे काम सुरू होते. वेळेत काम पूर्ण करण्यासाठी लोक रात्रंदिवस काम करत असल्याचे ते पहात. हे ठिकाण शहरापासून दूर होते. हे लक्षात घेऊन फक्त या लोकांसाठी अशी परिवहन सेवा सुरू करण्यासाठी त्यांनी दिल्लीला लिहिले. त्यांना उत्तर आले, शासकीय कर्मचाऱ्यांना वाहन सेवा देण्याची पद्धत नाही.
- भाभा यांनी पंडित नेहरूंना याविषयी कळवताना लिहिले, ''अणुऊर्जेची पूर्वपरंपरा भारताला नव्हती.'' नेहरूंनी या प्रकरणी लक्ष घातले व अणुऊर्जा विभाग कर्मचाऱ्यांची निकड असणारी वाहनसेवा उपलब्ध करून दिली.

भाभा : बहुआयामी व्यक्तिमत्त्व

***हे ईश्वरा, सर्वांना सुखात, आनंदात ठेव. त्यातच माझे सुख सामावले आहे.***
***- एक प्रार्थना.***

सामर्थ्य हा भाषेचा मोठा गुण आहे.



## *होमी भाभा - योजक द्रष्टा*

◈ डीएइचे विभाग देशात अंतर्गत भागांत दूरवर सुरू केले गेले. या ठिकाणी कर्मचाऱ्यांना उत्तम वैद्यकीय सुविधा मिळाल्यात म्हणून भाभा यांनी हॉस्पिटलस उभी करण्याच्या योजना राबवली.

◈ इतकेच नाही तर, कर्मचाऱ्यांच्या मुलांना उत्तम शिक्षण मिळेल याकडे त्यांनी लक्ष दिले. यासाठी खास शिक्षण मंडळ असावे (ॲटॉमिक एनर्जी एज्युकेशन सोसायटी) अशी कल्पना त्यांनी मांडली. परिसरातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालये हे शिक्षण मंडळ चालवेल, अशीही त्यांची कल्पना होती.

भाभा : बहुआयामी व्यक्तिमत्त्व



## *होमी भाभा - निसर्गप्रेमी*

◈ ज्यांनी अणुऊर्जा विभागाच्या (DAE) घटक संस्थांना भेट दिली असेल त्यांनी तेथील उत्तम उद्यानांची व जोपासलेल्या हिरवळीची स्तुती केलेलीच असेल.

◈ संस्थांच्या परिसरातून अशी निसर्गाशी जवळीक साधण्याची संस्कृती या संस्थांचे नेते होमी भाभा यांच्या विचारांतून विकसित झाली. ते स्वत: निसर्गप्रेमी होते व संशोधकांचे काम करण्याचे ठिकाण आल्हाददायक, कल्पक वृत्तीला प्रेरक ठरेल असे असावे याची काळजी घेणारे होते.

भाभा : बहुआयामी व्यक्तिमत्त्व



## *होमी भाभा - कलावंत*

◈ होमी भाभा यांना संगीत व चित्रांची आवड होती. कार्यबहुल अशा वेळापत्रकामुळे हे छंद जोपासण्यास त्यांना क्वचितच वेळ मिळे. तरीही ते संगीत व चित्रकला या त्यांना आनंद देणाऱ्या कलांसाठी वेळ काढत, त्यात रममाण होत.

◈ टी. आय. एफ. आर. या अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर कुलाब्यात उभ्या असणाऱ्या संस्थेस तुम्ही भेट दिलीत तर भाभा यांनी काढलेली चित्रे आजही पहायला मिळतात.

भाभा : बहुआयामी व्यक्तिमत्त्व



## होमी भाभा - सामाजिकीकरण झालेला शास्त्रज्ञ

- होमी भाभा एकलकोंडे नव्हते. सर्व क्षेत्रांतील लोकांशी संवाद साधणे, संबंध ठेवणे त्यांना आवडत असे.
- २० व्या शतकातील सर्व प्रमुख शास्त्रज्ञांशी त्यांचे चांगले संबंध होते. त्यातील अनेकांनी टी आय एफ आर ला भेट देण्याचे व मानद सभासदत्व स्वीकारण्याचे मान्य केले होते.

भाभा : बहुआयामी व्यक्तिमत्त्व



## होमी भाभा - निधनामुळे झालेली हानी

- परदेशात झालेल्या विमान दुर्घटनेत १९६६ साली भाभा यांचे निधन झाले. हे देशाचे फार मोठे नुकसान होते. त्यांनी उभारलेल्या संस्थांमध्ये आजही त्यांचे स्मरण पदोपदी जपले जाते.
- ट्रॉम्बे येथे उभारण्यात आलेल्या अणुऊर्जा संस्थेस त्यांचे नाव देण्यात आले आहे. आता ती संस्था भाभा ॲटॉमिक रीसर्च सेंटर (बी ए आर सी) या नावाने ओळखली जाते.
- विज्ञान व गणित शिक्षणातील संशोधनासाठी एक विभाग १९७४ साली डॉ. भाभा यांच्या नावे सुरू करण्यात आला. होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एज्युकेशन (एचबीसीएसइ) या नावाने तो ओळखला जातो.

भाभा : बहुआयामी व्यक्तिमत्त्व



## होमी भाभा - विनम्र अभिवादन !

भारत मातेच्या या महान सुपुत्राला जन्म शताब्दी निमित्ताने विनम्र अभिवादन !


धन्यवाद !

पारदर्शिका लेखन – **डॉ. सुधाकर आगरकर,** कल्याण
मराठी अनुवाद – **मोहन पाठक,** ठाणे

# संधी देणारी गवाक्षे

*मूल वाढवताना त्याच्या मेंदूचा विकास या विषयी पालकांनी विचार केलेला असला पाहिजे. त्या दृष्टीने मेंदूच्या विकासासंबंधीचे हे विचार – संपादक*

ज्या घरामधे लहान मुलं आहेत, विषेशत: ११ वर्षांपर्यंतची, त्या घरांमधे भौतिक सुविधा काय असाव्यात, घरांची रचना कशी असावी याबाबत थोडा शास्त्रीय अंगाने विचार करू या. मूल जन्माला आलं की आजूबाजूच्या परिस्थितीशी जुळवून घ्यायला शिकत असतं. भाषा, वस्तू, प्राणी, पक्षी, आकाश, चंद्र, सूर्य, व्यक्ती, नाती या सगळ्यांबद्दल त्याला हळूहळू ज्ञान प्राप्त होत असते. आणि ते समजण्याचे टप्पे, हे प्रत्येक बालकाचे त्याच्या नैसर्गिक क्षमतेप्रमाणे वेगवेगळे असू शकतात. 'शिकणे' हे मेंदूचे नैसर्गिक कार्य आहे. आकृतिबंध शोधणे, स्मृती जतन करणे, अनुभवांद्वारे शिकणे निर्मिती करणे हे मेंदूचे चार अपवादात्मक गुण असतात. प्रत्येक मानवाला जर या क्षमता प्राप्त झाल्या आहे तर मग प्रत्येकाचा जीवन संघर्ष हा निरनिराळा का असतो? यावरील नजीकच्या काळात झालेले संशोधन असं सांगत की, मानवी मेंदूची रचना तीन भागात झालेली आहे.



१) पहिला Reptilian Brain, म्हणजे सरपटणारा मेंदू. जो सरपटणाऱ्या प्राण्यांमधे असतो. हा श्वसन, अभिसरण, पुनरुत्पादन आणि शारिरिक धोक्यांमधे कार्यरत होतो.

२) दुसरा ममेलियन Brain, म्हणजे सस्तन प्राण्यांचा मेंदू. हा भावनांचा केंद्रबिंदू असतो. अनुभवांनुसार बदल घडवून आणण्यासाठी हा मेंदू जबाबदार असतो.

३) तिसरा Neocortex. हे ज्ञान ग्रहणाच कौशल्य विकसित करण्याचे केंद्र आहे. सर्व विचार बौद्धिक विकास, भाषा विकास आणि तार्किक विचारदृष्टीचा विकास Neocortex मधे होतो.

जन्मानंतर Neocortex ची बांधणी लगेचच होते. पहिल्या काही वर्षांतच मेंदूमध्ये अब्जावधी न्यूरॉन्स तयार होत असतात. हे न्यूरॉन्स जितके जास्त वापरले जातील. तितके ते जास्त तयार होत असतात आणि ते न वापरल्यास किंवा कमी वापरल्यास ते नाश पावतात आणि झडून जातात. अशा प्रकारे नष्ट झालेले न्यूरॉन्स पुन्हा तयार होत नाहीत. जास्त वापरल्या जाणाऱ्या न्यूरॉन्सच्या जोडणीमुळे मज्जातंतूमधे संवेदना पोचवणाऱ्या पेशींवर चरबीचा थर साठतो. यामुळे स्पष्ट आणि कार्यक्षम विद्युत प्रक्षेपण होतं. या प्रक्रियेला myelination म्हणतात.जेवढे समृद्ध आणि जास्त अनुभव, तेवढा myelinc चा थर जास्त तयार होतो. आणि जितका myelin चा थर जास्त तितकं मूल क्रियाशील आणि ज्ञानी होत असतं. आजूबाजूचे वातावरण विविध अनुभवांच्या बाबतीत जेवढे प्रगल्भ असेल तेवढी पेशींची जुळणी अधिक प्रमाणात होऊन, शिकणे अधिक वेगाने आणि अधिक परणिामकारकरित्या होत जाते. विशिष्ट कालावधीत विशिष्ट अनुभवांसाठी मेंदू भुकेलेला असतो. या कालावधीला तंत्रिक भाषेत 'संधींची गवाक्षे' असे म्हटलं जातं. भाषा शिकणे, भावनांवर नियंत्रण प्राप्त

करणे किंवा संगीत शिकणे, या गोष्टी प्रभावी रीतीने शिकल्या जातात. त्यामुळे आता घर काय किंवा शाळा काय, तिथे 'मेंदू आधारित शिक्षण' देण्याची गरज निर्माण झाली आहे.

लहान मुले ही स्वभावत:च खूप अस्थिर असतात. सारखी हालचाल करीत असतात. विविध पद्धतींनी होणारी ही शारिरिक हालचाल ही त्यांच्या विकासासाठी अत्यावश्यक अशी गोष्ट असते. कारण मुलांची शारिरिक हालचाल ही डाव्या आणि उजव्या मेंदूच्या भागांचा परस्परसंबंध घट्ट करीत असते. मेंदूच्या या दोन्ही भागांचा एकत्रित वापर करून, माहितीचे आदानप्रदान करून, मुले फार चांगल्या रीतीने आपल्या कामांवर लक्ष केंद्रित करू शकतात. घरी किंवा शाळेत मुलांना एका जागी गप्प बसवून ठेवणे हे त्यांच्या बौद्धिक विकासाला कसे हानिकारक आहे, हे यावरून लक्षात येईल. तेव्हा 'हाताची घडी तोंडावर बोट' म्हणजे मेंदूचे कार्य बंद, म्हणजे ज्ञान ग्रहणाची प्रक्रिया बंद.

मुलांना मोकळ्या, प्रेमळ आणि प्रसन्न वातावरणात विविधांगी अनुभव मिळाल्यास मुलांचे मेंदू पक्के बनतात. खुल्या प्रेमळ वातावरणापासून वंचित असणाऱ्या मुलांचे मेंदू क्षमतांच्या बाबतीत कमजोर राहण्याची शक्यता असते. ज्या घरांमध्ये अशी लहान मुले आहेत त्या घरांमधे भरपूर दारे आणि खिडक्या असाव्यात. जर तो बिल्डिंगमधील Flat असेल तर, गॅलरी असावी आणि घरामधे भरपूर सूर्य प्रकाश असावा. मोकळी हवा किंवा वाहता वारा खेळता राहील अशी दरवाजे व खिडक्यांची रचना असावी. घराच्या भिंतींना अल्हाददायक फिका रंग असावा जेणेकरून नैसर्गिक सूर्यप्रकाश परावर्तित होईल. घरातील लहान मूल ११-१२ वर्षाचे होईपर्यंत घराला महागडा किंवा नवीन रंग देऊ नये. कारण लहान मुलांना भिंतीवर गिरगटवायला/ चित्र काढायला खूप आवडतं. या मधून त्यांची सृजनशीलता विकसित होत असते. रंग किंवा रंगीत खडू किंवा पेन्सिल हातात मिळाली, की ती जमिनीवर किंवा भिंतीवर चालवणे, हा मुलांचा स्थायीभावच आहे.

घरामधील सर्व खोल्या जास्तीत जास्त मोकळ्या असाव्यात. कमीत कमी फर्निचर खोल्यांमधे असावे. याचे कारण मुलांना मोकळ्या जागेत वावरायला, खेळायला मिळाले तर त्यांची शारिरिक हालचाल सीमित रहात नाही. ज्यामुळे मेंदू जास्तीत जास्त कार्यरत रहातो. कपाटे, शोकेस केल्यास कमीत कमी जागेत किंवा भिंतीवरील कराव्यात त्यामुळे जमीनीचा भाग मोकळा राहील. काचेचे टी पॉय किंवा कपाटे ठेवणे टाळावे, कारण मग मुले मोकळी खेळत असताना ते चुकून फुटले, तुटले तर दोष मुलांकडे जातो. मग त्यांना मार, धाक, भीती या सर्वांना सामोरे जाव लागते. अशावेळी Neocortex चे कार्य थांबून भावना उद्दीपित करणाऱ्या मॅमॅलियन मेंदूचे कार्य घडू लागते. त्यातही अगदी असह्य असा ताण निर्माण झाला तर आणखी घसरण होऊन, केवळ जीवन मरणाच्या प्रश्नाभोवती कार्यरत असणाऱ्या सरपट मेंदूच्या पातळीवर जाऊन मुले विचार करणे सोडून आक्रमक तरी होतात किंवा विचारांपासून पलायन करतात.

आपणा सर्वांनाच घर सजवण्याची खूप हौस असते. हौशीपोटी आपण घराला महागडा रंग लावतो. सुंदर चकाचक फर्निचर करून घेतो. मस्त काचेची शो-केस, टी-पॉय, डायनिंग टेबल, LCD Tv screen वगैरे हे सगळे करून घर अगदी मस्त सुसज्ज करून घेतो. त्यातही मुलांची खोली असेल तर तिथे मस्त बेड, खेळण्यांची रॅक, महागडी खेळणी, computer टेबल वगैरे असतं. या सगळ्या मागचा उद्देश काय असतो? तर आलेल्या पाहुण्यांना आमचं घर किती सुशोभित आणि चकाचक आहे हे दाखवायचअसत. पण आपल्या मुलांच्या दृष्टीने आपण थोडा विचार केला तर एक लक्षात येईल की मुलांना खेळणी नको असतात, खेळ हवे असतात. तेव्हा त्यांना महागडी खेळणी नसली तरी भरपूर जागा उपलब्ध करून द्या, प्रेमळ, मोकळे वातावरण द्या म्हणजे त्यांची सृजनशीलता विकसित होईल.

घरामधील सुरक्षित वातावरण हे देखील मेंदू सुसंगत आहे. सुरक्षित म्हणजे दारं-खिडक्या बंद ठेवून किंवा एखाद्या प्रौढाच्या देखरेखीखाली अशा अर्थाने नव्हे, तर मूल खेळत असलेल्या ठिकाणी खिळे, सळ्या, लोखंडीबार किंवा पट्ट्या हे खेळताना लागता कामा नये. सुऱ्या, कात्र्या, औषधे हे सर्व मुलांच्या हाताशी न येतील अशा ठिकाणी ठेवणे हेही महत्त्वाचे ठरते.

मुलांना निसर्गाकडे नेणे हे फार महत्त्वाचे आहे. तेव्हा घराच्या गॅलरीमधे फुलझाडे लावणे, लहान प्रमाणात भाज्या किंवा आले, कडीपत्ता, सारखी रोपे लावणे. लावण्या पेक्षा मुलांकडून हे करून घेणे, त्यांना करायला देणे हे महत्त्वाचे. या मधून मुलं विज्ञान शिकतात, भाषा विकास होतो, परिसराची ओळख होते आणि निसर्गाच्या सान्निध्यात राहिल्यामुळे मनावरील ताण कमी होऊन, मन प्रफुल्लित, टवटवीत होते.

निसर्गाकडे नेण्याचा आणखीन एक मार्ग म्हणजे घरामधे पाळीव प्राणी असणे. एखादं मुलं घरामधे एकुलतं एक असेल किंवा सोसायटीमधे शेजारी पाजारी त्याच्या वयाची मुलं नसतील तर अशा वेळी हे पाळीव प्राणी सखा-साथीदार म्हणून उपयोगी पडतात. मासे, कुत्रा हे प्राणी तर मुलांबरोबर चक्क मूक संवाद करत असतात. यामुळे मुले संवेदनशील होतात आणि बऱ्याचदा या आपल्या मुक्या साथीदाराच्या मुक्या स्पर्शामुळे मुलांच्या कोंडलेल्या भावनांच विरेचन होत. इथे अर्थात मुलांना स्वच्छता आणि सुरक्षिततेची जाणीव त्यांच्या भोवतालच्या मोठ्या माणसांनी करून देणे महत्त्वाचे असते.

मुलांना गंधांचा अनुभव देणं ही शास्त्राच्या दृष्टीने मेंदूसुसंगत वातावरण निर्माण करण्यासाठी महत्त्वाचं ठरतं. दरवळणारा सुगंध हा मेंदूला क्रियाशील ठेवण्यास मदत करत असतो. विविध फुलांचे सुगंध, अत्तर, उद्बत्त्या, स्प्रे यांचे सुगंध तसेच स्वयंपाक घरातील विविध गंध जसे मसाल्याचे, फोडणीचे, गोड पदार्थांचे असे अनेक सुगंध मुलांना अनुभवण्यास द्यावे.

मेंदू सुसंगत वातावरणासाठी संगीताचेही एक वेगळे महत्त्व आहे. तेव्हा घरामधे अनेक प्रकारची वाद्ये, गाणी यांचा आवाज योग्य कालावधीपर्यंत जरूर वाजत रहावा.

तेव्हा मुलाच्या शिकण्याचं स्वरूप आणि दर्जा हे त्याच्या मानसिक स्थितीवर अवलंबून आहे. घरामध्ये लहान मूल असल्यास त्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने त्याला मेंदू सुसंगत वातावरण उपलब्ध करून दिल्यास आणि जास्तीत जास्त अनुभवांची संधी दिल्यास, योग्य त्यावेळी योग्य ती 'संधीची गवाक्षे' खुली होऊन परिणामकारक संवर्धन होण्यास मदत होईल.

(● आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवरून प्रसारित झालेल्या व्याख्यानाचे हे लेख स्वरूप आहे. आकाशवाणीच्या सौजन्याने ते मुद्रित करीत आहोत - संपादक)

**सौ. विशाखा देशपांडे**
सौ. आनंदीबाई जोशी
इंग्रजी माध्यम शाळा, नौपाडा, ठाणे.

●●●

## आवर्जून वाचावे असे संपादकीय

२० सप्टेंबर २००९ च्या टाईम्स ऑफ इंडियातील हिंदू दत्तक कायद्याच्या संदर्भात अंतर्मुख करणारे विचार मांडणारे संपादकीय सद्धर्मच्या ऑक्टोबरच्या अंकात आहे. सामाजिक मूल्यांचा ऱ्हास कसा चालू आहे हे, हे संपादकीय वाचल्यावर उलगडते.

सद्धर्मचा हा वर्ष ४४/ अंक क्र. ३ असा आहे. डॉ. विजय बेडेकर हे सद्धर्मचे संपादक आहेत.

**- कार्यकारी संपादक**

●●●

# संत कान्होपात्रा

*संत कवयित्रींची परंपरा फार मोठी आहे. या परंपरेतील संत कान्होपात्रा यांच्या परिचयाचा श्री. शंकरराव मठ यांनी लिहिलेला हा लेख - संपादक*

ही एक मराठी प्रसिद्ध संत कवयित्री. ती मंगळवेळे येथील शामा या गणिकेच्या पोटी जन्माला आली. आपला व्यवसाय मुलीने पुढे चालवावा अशी आईची इच्छा होती. परंतु कान्होपात्रा हिला ते पटले नाही. कान्होपात्रा पंढरपुरास जाऊन विठ्ठल भक्ती व संतांच्या संगतीत विरक्त जीवन जगू लागली. मात्र तिचे लावण्य अनेक वेळा तिला घातक ठरले. महीपतीकृत भक्तिविजय ग्रंथात तिचे चरित्र आले आहे. तिचे पंचवीस-तीस स्फुट अभंग आहेत. संबोधता, आर्तता, आत्मनिष्ठा ही तिच्या अभंगाची वैशिष्ट्ये आहेत.

**ती शेवटी देवमय झाली :**

पंढरपुराहून सात कोसावर मंगळवेढे हे इतिहास प्रसिद्ध ठिकाण आहे. तेथे शामा नावाची एक गणिका राहात होती. तिची मुलगी कान्होपात्रा सौंदर्य आणि गोड गळा यांमुळे तिच्यावर अनेक संकटे आली. पण ईश्वरी कृपेने ती त्यातून निसटली. 'अरक्षितः तिष्ठति देव रक्षितम्' लहानपणा पासून तिचा ओढा ईश्वराकडे होता. ती विठ्ठल भजनात नेहमी दंग असे. शेवटी विठ्ठलानेच तिला आपल्या पायाशी कायमची ठेवून घेतली.

**आईचा बेत :**

कान्होपात्राची आई तिच्या सौंदर्यावर व गोड गळ्यावर बेहद्द खूष होती. आपल्या व्यवसायाला लागणारे हे गुण तिच्या ठिकाणी प्रकर्षाने असल्याने, उदरभरणाला लागणाऱ्या पैशाची तिला कधीच काळजी वाटत नसे. तिची आई तिला आपला व्यवसाय सोडून कसे चालले असे परोपरीने पटवून देत असे. आपण धनिक गिऱ्हाइकाकडे आपलेपणाने बघितले पाहिजे. मी तर बेदरच्या बादशाहाशी तुझे संधान बांधण्याची व्यवस्था करीत आहे.

**एका घटनेने कान्होपात्रेवर झालेला परिणाम :**

मध्यंतरी कान्होपात्रा आपल्या प्रियकराशी मोकळेपणाने बोलत होती. प्रेम संवाद व प्रियाराधन या गोष्टीचा बहर येत चालला होता. अशा एकान्त समयी त्या प्रियकराचे वडील कान्होपात्रेच्या घरी आले. बापाने मुलाची चांगलीच खरडपट्टी काढली. ते म्हणाले कुलांगार कारट्या माझ्या पोटी येऊन कुलाचा नावलौकिक चांगला गाजविलास. आईची आठवण ठेविली नाहीस. सज्जनांचे संसार बुडविणाऱ्या ह्या कुलट्या -- तुझी लग्नाची बायको घरी तुझ्यासाठी धाय मोकलून रडते. तिच्या करुण किंकाळ्या तुला ऐकू येत नाहीत. व्यापाराकरता दिलेला पैसा इथे ओतून शरम नाही वाटत. कान्होपात्रा प्रियकराच्या वडिलांची कठोर भाषा ऐकून स्तिमित होऊन गेली. तिला आश्चर्याचा धक्का बसला. ती काकुळतीला येऊन बोलली. माझा प्रियकर विवाहित आहे हे मला आता कळले. त्याच्या बायकोच्या संसाराच्या विध्वंस करणारी चांडाळीण मी ठरणार. हे फार घोर कर्म आहे. ती प्रियकराला म्हणाली महाराज आपण उच्च कुळातले आहात. येथून जितक्या लवकर जाल तितके बरे. तिने आईला सांगितले. यांचेकडून घेतलेले पैसे परत कर. माझ्या प्रेमाची विक्री नको.

**कान्होपात्रा वारकरी झाली :**

घडलेल्या घटनांचा तिच्या मनावर मोठा परिणाम झाला. ती शांत झाली. पुढील मार्गाची आखणी सुरू

झाली. मंगळवेढे पंढरपूर पासून फार दूर नाही. एकादशीला अनेक वारकरी विठ्ठलाचा गजर करीत पंढरीला जात. लहानपणापासून तिचा ईश्वराकडे ओढा होताच. तिने वारकरी बंधूकडून अनेक उपयुक्त माहिती मिळविली. आपण एका गणिकेची मुलगी. पंढरीत आपल्याला थारा मिळेल की नाही असे विचार तिच्या मनात घोळू लागले. शेवटी तिने एका दिंडीबरोबर जाण्याचे ठरविले. विठ्ठल भेटीची तळमळ तिला लागली. तिने पंढरीला जाण्याचे ठरविले. आईला नमस्कार करून ती दिंडीच्याबरोबर पंढरीची वाट चालू लागली.

वाटेत भक्तिपर अभंग रसाळपणे गाऊन तिने सर्वांची मने रिझविली. तिच्या गळ्यातून गोड गाणी ऐकण्याकरता लोक अतिशय उत्सुक असत. वारकऱ्यांनी तिला आदराने आणि कौतुकाने पांडुरंगाच्या महाद्वारापाशी आणले. तिचा आनंद हृदयात मावेना. जीवनाची सार्थकता झाल्याचे समाधान तिला लाभले. ती आनंदित झाली तिची नि:सीम भक्ती, विठ्ठल भेटीची आर्तता, अभंगातील अवीट गोडी इत्यादी गोष्टींमुळे तिची ख्याती पंढरपुरात पसरली.

संत कान्होपात्रा ही वारकऱ्यांचे जीवन लहानपणापासून जवळून पहात होती. पंढरीचा राजा सखा पांडुरंग हा अतिशय सात्विकतेचा कळस व सदाचरणी सज्जन व प्रेमळ आहे ह्याचा तिच्या जीवनावर बाळपणीच ठसा उमटला होता. त्यामुळे विठ्ठल भक्तीत ती पूर्ण रंगून गेली. प्रतिवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशीस पंढरीच्या वारकऱ्याबरोबर वारी करी आणि विटेवर उभे असलेल्या विठ्ठल माऊलीचे नयनरम्य रूप पाहून देहभान हरपून वारकऱ्यांच्या मेळाव्यात चंद्रभागेच्या वाळवंटात विठ्ठलाच्या नामघोषात नाचत असे. आपले आयुष्य स्वैराचारात न घालवता तिने विठ्ठलाच्या भक्तीत घालवण्याचा प्रगट निश्चय आईला सांगितला. शामा नायकिणीला कान्होपात्रेला व्यवसायाला लावून अमाप पैसा मिळविण्याचे वेड लागले होते. पण कान्होपात्रा नृत्य गायनाने विठ्ठल भक्तीत पूर्णपणे रमून जीवन कंठित होती.

**तिच्या सौंदर्यामुळे संकट गुदरले :**

कान्होपात्राच्या अप्रतिम सौंदर्यावर भाळून समाज-कंटकानी तिला जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न सुरू केला. पण त्या दुष्टांना ते साध्य झाले नाही. म्हणून तिचावर अन्य मार्गाने सूड उगवण्याचा ते प्रयत्न करू लागले. त्या दुष्टाने बादशहाला तिच्या सौंदर्याबद्दल सांगून त्याचे मन विचलित केले. तिच्या असामान्य सौंदर्याची कीर्ती बेदरच्या बादशाहाच्या कानावर गेली. आपल्या दरबारात अशी रूपवान कलावंत सुंदरी असावी या इच्छेने त्याने तिला आणण्याची तयारी केली. त्याच्या मोबदल्यात बादशाहा कान्होपात्रेच्या आईला खूप धन देण्यास तयार झाला. जरूर पडल्यास जबरीने तिला दरबारात आणावे, असा आपल्या सैनिकांना आदेश दिला.

बादशाहाच्या सैन्याने तिला घेरले. त्या प्रसंगाने न डगमगता ती सैनिकांना म्हणाली - आपणाबरोबर मी यावे अशी बेदरच्या बादशाहाची इच्छा असेल तर एकदा मला विठ्ठलाला भेटून येऊ द्या. तिची ही विनंती सैनिकांनी मान्य केली. कान्होपात्रा संकटात सापडली. तिने पांडुरंगाशी धरणे धरले. आळवून ती देवाला म्हणाली

**पतित तू पावन म्हणसी आधी।**
**तरी का उपाशी भक्तामागे।**
**पतित तू पावना। म्हणविसी नारायणा।**
**तरी सांभाळ वचन। ब्रीद वागविशी जाण।**
**कान्होपात्रा शरण पायी।**

सैनिक तिला पंढरपूरला घेऊन आले. संत कान्होपात्रा गाभाऱ्यात शिरली मंदिराभोवती सैनिक वेढा घालून उभे राहिले.

विठ्ठलाच्या जीवनाशी एकरूप होऊन अत्यंत तन्मयतेने विठ्ठलाच्या चरणावर अश्रूंचा अभिषेक करून

ती विठ्ठलाला म्हणाली – अरे प्राण सख्या विठ्ठला राजसत्तेने जबरीने माझ्या सौंदर्यासाठी मला वेढा घातला. तुझ्या भावभक्तीच्या प्रेमाला आणि भक्त वत्सलाला व मोठेपणाला हे आव्हान आहे. ते मी स्वीकारते. मी म्हणते–

**हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले।**
**मज लागी जाहले तैसे देवा।**
**तुजविण ठाव न दिसे त्रिभुवनी।**
**द्यावे वो जननी विठाबाई।**
**नको देव राया अंत पाहू आता।**
**प्राण हा सर्वथा फुटो पाहे।**

घेई कान्होपात्रा हृदयात। असे म्हणत तिने विठ्ठलाच्या पायाला घट्ट मिठी मारली. त्याचे पाय अश्रूंनी भिजविले. आणि आश्चर्य म्हणजे तिथल्या तिथेच तिने डोळे लावून ती कायमची ध्यानस्थ झाली. ती विश्वाच्या विश्वनाथाकडे गेली. तिचे पावित्र्य अभंग राहिले. तिचे सोने झाले. ती विठाईत विलीन झाली. संतांच्या मेळाव्यात मानाचे पान मिळवून कान्होपात्रा अजरामर झाली.

**सैनिकांकडून हालचाल :**

बराच वेळ झाला तरी कान्होपात्रा बाहेर का येत नाही म्हणून सैनिक गाभाऱ्यात गेले. ते पाहातच राहिले. कान्होपात्रा विठ्ठलाच्या चरणावर डोळे लावून मृत झालेली आढळली. ते सारे सैनिक मुकाट्यांने बेदरच्या बादशाहाकडे गेले. त्यानी कान्होपात्रेच्या बाबतीत घडलेला सर्व प्रकार सांगितला. बादशाहा सैनिकांवर संतापला. ती सौंदर्याची खाण असताना जिवंतपणी तिला पाहणे मला शक्य झाले नाही. आता तिच्या मृत देहाचे सौंदर्य पहावे म्हणून तो निवडक सैन्यानिशी पंढरीला आला. पुजाऱ्यांच्या परवानगीने गाभाऱ्यात प्रवेश करून विठ्ठलाच्या चरणावर मृत होऊन पडलेल्या कान्होपात्रेचे मृत परंतु सौंदर्यपूर्ण कलेवरावर नजर फिरवून विठ्ठलाकडे नजर फिरविली. त्याचा कायापालट झाला. आणि तो बादशाहा विठ्ठलाचा भक्त झाला.

कान्होपात्रेला वंदन करून तेथून परतला, तेव्हापासून त्याने सतत पंढरीची वारी सुरू केली. विठ्ठलाचा भक्त म्हणून पदवी प्राप्त करून घेतली.

**शेवट :**

संत कान्होपात्रा हिचा मृत देह वारकरी मंडळींनी ताब्यात घेतला. मंदिराशेजारी तिला अग्नी दिला. तिच्या अस्थी मंगळवेढ्यास आणून तिथे समाधी बांधली. संत कान्होपात्राचे आयुष्य अल्प असले तरी तिने आपले जीवन विठ्ठलमय करून टाकले. संकटे आली असता चारित्र्य संवर्धन करून विठ्ठल भक्तीने साक्षात्कार करून घेतला. इतकेच नव्हे त्यामुळे चारित्र्यहनन करण्यासाठी आलेल्या बादशाहात परिर्वतन घडले. विठ्ठल भक्तीने साक्षात्कार करून घेता येतो हे जगाला दाखवून दिले. भक्त, संत कवयित्री म्हणून ती प्रसिद्ध पावली व अमर झाली.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे – ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

*ईश्वरीय अज्ञान*

काहीतरी अपेक्षेने किंवा नवस बोलण्यासाठी देवदर्शनाला जाणाऱ्यांची संख्या वाढत आहे. 'नवसाला पावणारा गणपती' ही संकल्पना भलतंच स्वार्थी मूळ धरू लागली आहे. समाजमनावर याचा विपरीत परिणाम होतोय. ज्या गणेशाने सर्व मोह, लोभ, विकारांचा त्याग केला, त्या वीतरागी गणेशाकडे नवस बोलणं, हे ईश्वरीय अज्ञानाचं द्योतक आहे.

– संकलित

# परमेश्वर प्राप्तीचा मार्ग

*परमेश्वर प्राप्तीचे अनेक मार्ग भारतीय तत्त्वज्ञानात सांगितले आहेत. हा विषय अतिशय गहन, चिंतन करावा असा आहे. श्री. माने यांनी व्यक्त केलेले हे विचार – संपादक*

परमेश्वर आहे किंवा नाही हा एक वादाचा विषय असला तरी परमेश्वराच्या अस्तित्वासंदर्भात विचार केल्यास आपणास दोन प्रकारची माणसे दिसून येतात. पाहिल्या प्रकारची माणसे म्हणजे देवाला मानणारी, देवाचे अस्तित्व आहे असे समजणारी माणसे. म्हणजेच अस्तिक स्वरूपाची माणसे. तर दुसऱ्या प्रकारची माणसे म्हणजे देवाला न मानणारी, देव नाहीच आशा स्वरूपाची समजूत असणारी नास्तिक स्वरूपाची माणसे. देवाच्या आस्तित्वासंदर्भात दोन प्रकारची माणसे दिसून येत असली तरी आगदी खोलवर जाऊन विचार केल्यास आपणास असे दिसून येते की, या पृथ्वीतलावरील सर्वच माणसे आस्तिक असतात, देवाला मानणारी असतात.

स्वतःला आस्तिक किंवा नास्तिक समजणाऱ्या या दोन प्रकारच्या माणसामध्ये फरक एवढाच असतो की, आस्तिक स्वरूपाची माणसे सदैव नित्य देवाची प्रार्थना करतात, पूजा करतात, त्याचे स्मरण करतात. त्यांचा परमेश्वरावर विश्वास असतो आणि स्वतःला नास्तिक म्हणवणारी माणसे संकटात सापडल्यानंतरच देवाची आठवण काढतात, त्याचे स्मरण करतात किंवा परमेश्वराचा धावा करतात. हे परमेश्वरा, मला या संकटातून वाचव आशी विनवणी परमेश्वराला करतात. याची आपणास अनेकवेळा प्रचीती आल्याचे दिसून येते. म्हणजेच नास्तिक स्वरूपाची माणसे वरवर कितीही नास्तिकतेचा आव आणत असली तरी त्यांचे अंतर्मन देवाला मानतच असते. म्हणून तर संकटसमयी का होईना त्यांना परमेश्वराची आठवण येत असते. नास्तिक माणसे वरवर देवाला मानत नाहीत असे दाखवतात. पण त्यांचे अंतर्मन  खऱ्या अर्थाने आपण देवाला मानतो हे त्यांनाच सांगत असते.

आस्तिक स्वरूपाची जी माणसे असतात किंवा देवाला मानणारी माणसे असतात त्यांच्यामध्येही आपणास दोन प्रकारची माणसे दिसून येतात. काही माणसे अशी असतात की, त्यांना परमेश्वराकडून काही अपेक्षा नसते. त्यांच्याकडे धन, दौलत, पैसा, संपत्ती, सर्व काही असते. म्हणून ते परमेश्वराकडे याची मागणी करीत नाहीत.आणि काही माणसे अशीही असतात की, त्यांना संसारात सुख, शांती, समृद्धी, आनंद तसेच समाधान अपेक्षित असते. म्हणून ते परमेश्वराची पूजा करतात, स्मरण करतात. परमेश्वराकडून कसलीही अपेक्षा न ठेवता पूजा करतात, स्मरण करतात. ही माणसे आणि काहीतरी अपेक्षा मनात ठेवून पूजा करणारी माणसे यांना खरोखरच देव पावतो का? त्यांची भक्ती पाहून अशा माणसांच्या संकटसमयी परमेश्वर धावून येतो का?

तर अशा माणसांच्या मदतीला परमेश्वर नक्कीच धावून येत नाही. आपणास जायचे असते मद्रासला पण आपली प्रवासाची दिशा असते गुजरातला जाण्याची. अशाने आपण आपल्या योग्य ठिकाणी पोहोचणार नाही. म्हणून, आपणास इच्छित स्थळी पोहोचण्यासाठी दिशा योग्य असायला हवी. आयुष्यात योग्य दिशा नसेल तर आयुष्याची दशा होण्यास वेळ लागत नाही. असेच परमेश्वर प्राप्तीसाठीही असते. परमेश्वर प्राप्तीचा नेमका कोणता मार्ग आहे हे पाहूनच त्या दिशेने प्रवास केला पाहिजे. आज अनेक माणसे रात्रंदिवस परमेश्वराच्या नावाचा जप करीत

असतात. हे आपण पहातो. या ठिकाणी आपण एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी ती म्हणजे आपण दिवसभर कितीही वेळा मुखातून परमेश्वराचे नाव घेतले, त्याचे भजन केले किंवा अनेक तास पूजा केली म्हणून आपणास परमेश्वर प्राप्त होत नाही. काही वेळा तर आपण परमेश्वराला मंत्र्यासारखी आश्वासने देत असतो. पण प्रत्यक्षात मात्र काहीच करीत नाही. माझे अमूक काम पूर्ण होऊ दे मी तुला सोन्याचा हार घालतो किंवा माझे अमूक एखादे झाले तर मी तुला बोकड कापतो वगैरे वगैरे. परंतु ते काम पूर्ण झाले तर वायदा मात्र आपण निभावत नाही. अशावेळी परमेश्वर कसा प्राप्त होणार? परमेश्वराचे नाव घेताना किंवा त्याची पूजा करताना आपले मन मात्र संसारात गुंतलेले असते. मनामध्ये धंद्यामधील नफा-तोटयाचा विचार चाललेला असतो. नातेवाईकांची चिंता असते. नोकरीमधील विचार चालू असतो. घरातील अनेक गोष्टीमध्ये मन गुंतलेले असते. म्हणूनच आपणास परमेश्वर प्राप्त होत नाही. परमेश्वर प्राप्त करून घ्यायचा असेल तर या सर्व मोहमायेतून बाहेर पडायला हवे. केवळ औपचारिकता म्हणून किंवा पूजा करायची म्हणून आपण ती करीत असतो.

परमेश्वर प्राप्त करून घ्यायचा असेल तर सर्वप्रथम आपण त्याला ओळखले पाहिजे. आपल्या मनात परमेश्वराबद्दल प्रेम जागृत व्हायला हवे. आपले मन परमेश्वराशी जोडले गेले पाहिजे. म्हणजे मनाचे आणि परमेश्वराचे नाते भक्कम असावे. ज्यावेळी आपले मन आपण परमेश्वराच्या सान्निध्यात ठेवतो त्याचवेळी मन आणि परमेश्वर यांच्यात संवाद होऊ शकतो. म्हणून आपले मन ज्या अवस्थेत असेल त्या अवस्थेत परमेश्वराला अर्पण केले पाहिजे. अगदी मनात अनेक वाईट भावना किंवा विचार असतील तरीही ते आपण न घाबरता त्याच्या स्वाधीन करावे. मनाला सुधारण्याचे काम परमेश्वर करीत असतो. म्हणून प्रथम त्याला परमेश्वराच्या स्वाधीन करावे. परमेश्वराला आपल्याकडून काहीही नको असते. हवे असते ते मन. दिवसातून एखादाही तोंडातून परमेश्वराचे नाव घेऊ नका पण आपले मन मात्र त्याच्याशी जोडले गेले पाहिजे. मनाचे आणि परमेश्वराचे घनिष्ठ संबंध जुळायाला हवेत. जे काही करायचे आहे ते मनापासून करा त्याशिवाय परमेश्वर प्राप्त होत नाही. काहीजण म्हणतील परमेश्वर तर एकच आहे मग या पृथ्वीवरील अबजावधी लोकांची प्रार्थना तो कशी ऐकेल? आपली प्रार्थना परमेश्वराजवळ कशी पोहोचेल? अशा लोकांना मी सांगू इच्छितो की, एखाद्या जत्रेत किंवा प्रचंड जनसमुदायात एखादा लहान मुलगा हरवल्यानंतर ते मूल रडण्याचा आवाज त्याची आईच फक्त ओळखू शकते. इतरांना तो आवाज ओळखता येत नाही. कारण आईचे आणि त्या मुलाचे घनिष्ठ संबंध असतात. त्यांच्यात जिव्हाळा असतो. तसेच परमेश्वराचे असते. या अब्जावधी लोकामधून ज्यांची प्रार्थना किंवा पूजा बेंबीच्या देठापासून असते त्यांचीच प्रार्थना परमेश्वर ऐकत असतो. ज्याप्रमाणे मुलगा हरवल्यानंतर आई तो मिळावा म्हणून व्याकूळ होते, ज्या पोटतिडकिने धावा करते, तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा थांबत नाहीत, त्याचप्रमाणे परमेश्वर प्राप्तीसाठी आपण धावा करायला हवा. त्याच्या दर्शनासाठी डोळ्यांतून अश्रू ढाळले पाहिजेत. अन्यथा परमेश्वर प्राप्ती शक्य नाही.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३,
सुभाष रोड, कुंभारखान पाडा,
डोंबिवली (प.), जि. ठाणे

●●●



# आधुनिक कर्मयोगी - पू. पांडुरंगशास्त्री आठवले

*पांडुरंगशास्त्री आठवले यांचे कार्य स्वतःसिद्ध आहे. ऑक्टोबर १९ ही त्यांची जयंती स्वाध्याय परिवारातर्फे 'मनुष्य गौरव दिन' म्हणून साजरी केली जाते. त्या निमित्ताने दिशाचे वाचक व चाहते श्री. गाणार यांचे हे विचार - संपादक*

'स्वाध्याय' परिवाराच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचे महान कार्य पु. पांडुरंगशास्त्रीजींना या देशात घडवून आणले. वर्षानुवर्षे उपेक्षित असलेला महाराष्ट्र, गुजराथ मधील कोळी, समाज, तसेच महाराष्ट्रात असलेला वनवासी आदिवासी समाजाला मुख्य समाजधारेत सन्मानाने त्यांनी आणले. त्यांच्याच कर्तृत्वाने या समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करणारे कार्य त्यांनी घडून आले. या समाज बांधवांना प्रत्यक्ष भगवद् गीतेतील कर्मयोगाचा सिद्धांत त्यांच्याच भाषेत समजावून देऊन त्यांच्यातील निरपेक्ष भावना जागृत करून एक महान कार्याची श्रृंखला निर्माण केली. भक्तीच्या विचारधारेतून माणसातील अज्ञान, द्वेष, मत्सर, आणि सूडभावना दूर सारून त्यांच्यातील 'माणूस' जागा करून त्याला आपल्याच सामाजासाठी निरपेक्ष भावनेने कार्यप्रवण करण्याचे महान कार्य पु.पांडुरंगशास्त्री आठवलेंनी केले.

मानवाला जशी अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गोष्टींची गरज असते, तशीच मानवी मन वाढविण्यासाठी मनाला संस्कारित करण्यासाठी भक्ती, भाव, प्रेम, विचार व आत्मीयता यांचीही गरज असते. या गोष्टी प्रत्येक व्यक्तीमध्ये जागविण्याचे कार्य स्वाध्याय परिवाराच्या माध्यमातून पु. पांडुरंगशास्त्रींनी घडवून आणले.

स्वाध्याय परिवारामार्फत आतापर्यंत समाज जीवनाच्या विविध क्षेत्रात अनेक प्रयोग चालू आहेत. यामध्ये योगेश्वर कृषीमंदिर, योगेश्वर वृक्षमंदिर, श्रीदर्शनम्, अमृतालयम् तसेच पतंजालि चिकित्सालय आदी मोठे उपक्रम चालू आहेत. या उपक्रमांच्या माध्यमातून मानवी जीवनामध्ये चैतन्य निर्माण होत आहेच, परंतु वसुधैव कुटुंबकम् ही कल्पना प्रत्यक्ष साकारलेली पहावयास मिळते. या सर्व प्रयोगांमधून व्यक्ती व्यक्तींवरचे निरतिशय प्रेम, वृक्षांवरचे निरपेक्ष प्रेम, प्रत्येक कुटुंबात नांदणारे भावजीवन आणि जीवनाकडे पाहण्याची विधायक तसेच सकारात्मक दृष्टी प्रत्येक मानवाला मिळते.

गेली ७० वर्षे अशा प्रकारच्या स्वाध्यायाच्या माध्यमातून पू. पांडुरंगशास्त्रीजींनी समाज उभा केलेला आहे. शास्त्रीजेंचे बुद्धिप्रामाण्यवादी तत्त्वज्ञान, सामान्यातला सामान्य माणूस आपल्या जीवनात उतरवू शकतो, हेच शास्त्रीजींच्या विचारांचे आणि कार्यप्रणालीचे मोठे वैशिष्ट्य आहे. स्वाध्यायाच्या माध्यमातून माणसा-माणसांमध्ये निर्माण होणारे चैतन्य आणि एकमेकांबरोबरचे भावनिक संबंध व निरपेक्ष प्रेम याद्वारे आज प्रत्येक खेडेगावात माणूस घडतो आहे. शास्त्रीजींनी दिलेल्या मार्गाने सामान्यातला असामान्य माणूस जागा होत आहे. त्यातून विचारांची क्रांती घडते तसेच गावातील विविध जाती, संप्रदाय, यांचे मिलन होऊन एका कुटुंबाची रचना निर्माण होताना दिसत आहे.

स्वाध्यायाच्या माध्यमातून सुरू झालेले हे कार्य आज विश्वाला गवसणी घालताना दिसत आहे म्हणूनच जागतिक स्तरावरील अनेक मान्यवर आपल्या देशात येऊन हे प्रयोग पाहिल्यानंतर आश्चर्यचकित होतात. या मान्यवरांमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील अर्थतज्ज्ञ पॉल आयकिन्स, जागतिक विद्वान डॉ. रेहनुमा, तसेच टेक्सास विद्यापीठाचे इतिहास विभागाप्रमुख प्रो. बेट्टी अंटरबर्जर इत्यादींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

(पृ. २३ वर)

# शैक्षणिक ग्रंथालयातील रात्र महाविद्यालयाच्या संदर्भात

*एन.एस.एस. अध्यापक महाविद्यालय, ताडदेव येथे झालेल्या राज्यस्तरीय अधिवेशनात सादर करण्यात आलेल्या निबंधाचा हा मराठी अनुवाद. ९ सप्टेंबर २००९ रोजी झालेल्या या अधिवेशनात सदर निबंध प्रा. श्रीनिवास आठल्ये यांनी सादर केला होता. – संपादक*

**प्रस्तावना :**

लोकांमध्ये ज्ञान रुजवून त्यांना देशाचे सुजाण नागरिक बनवणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. या ध्येयाच्या पूर्तीसाठी शैक्षणिक ग्रंथालये मोठा हातभार लावतात. ग्रंथालयाला मोठा इतिहास आहे. सुरुवातीच्या काळातील शृंखलाबद्ध ग्रंथांचा समावेश असलेल्या व बंद द्वार पद्धतीने देवघेव चालणाऱ्या ग्रंथालयांपासून ते आजच्या काळातील आधुनिक तंत्रज्ञान वापरणाऱ्या ग्रंथालयांपर्यंत हा प्रवास आहे. बदलत्या युगाच्या वाऱ्याने ग्रंथालयासारख्या संस्थांना माहितीच्या स्पर्धात्मक जगाला तोंड देण्यास भाग पाडले आहे. कारण, ग्रंथालये ही भूतकाळाकडून ढकलली जात आहेत तर भविष्यकाळाकडून खेचली जात आहेत. एक आत्यंतिक गरज म्हणूनही आपल्या विविध आदर्शवत कार्यप्रणालींनी (Best practices) वाचकांना आपल्याकडे ओढून घेण्याची गरज आता ग्रंथालयांना वाटू लागली आहे.

**रात्र महाविद्यालय :**

रात्र महाविद्यालये ही इतर सर्वसामान्य दिवसा भरणाऱ्या महाविद्यालयांहून निराळी असतात. नॅकच्या (NAAC) दृष्टिकोनातून या महाविद्यालयांचे सर्वच घटक समान असले तरी, रात्र महाविद्यालयातील विद्यार्थी हा दिवस महाविद्यालयापेक्षा वेगळा असतो. तो गृहिणी, ज्येष्ठ नागरिक, कामगार, लघुउद्योजक, असा कुणीही असू शकतो. त्याचे प्राधान्य शिक्षणाला नसून उद्योगधंदा व मिळकत यांना असते. अचानक दोन तासाच्या जादा कामांची (Over time) संधी मिळाली तर त्या दिवशी सहामाही परीक्षेचा महत्त्वाचा पेपरही बुडवण्याची मानसिकता असणारे हे विद्यार्थीही असतात. आणि म्हणूनच अशांसाठी रात्र महाविद्यालये विशिष्ट हेतूने कार्य करतात. 'कमवा आणि शिका' या तत्त्वाचा सर्वात जास्त अवलंब जर कुठे केला जात असेल तर तो रात्र महाविद्यलयातच आणि याचसाठी मला रात्र महाविद्यालयातील आदर्शवत कार्यप्रणालींचा आढावा घ्यावासा वाटतो.

या संदर्भात मी आमच्या रात्र महाविद्यालयाचे उदाहरण घेतले आहे. हे महाविद्यालय नॅक मूल्यांकित असून आयएसओ ९००१ : २००८ प्रमाणपत्रधारक आहे.

**आदर्शवत कार्यप्रणाली :**

म्हणजे काय? ज्या योजना प्रचलित प्रगतीबाबत सजग असतात, औपचारिक व अनौपचारिक ज्ञानसाधने वापरून नव्या ज्ञानाची भर घालत असतात व मुद्रित, तसेच ऑनलाईन (Online) माध्यमांद्वारे निरंतर स्वयंशिक्षण घेण्यास साहाय्यभूत ठरत असतात, त्या पद्धतींना आदर्शवत कार्यप्रणाली म्हणतात.

आजच्या स्पर्धात्मक युगात आपण आपली विचारप्रणाली बदलली पाहिजे. वाचक स्वत:हून ग्रंथालयात येतील या आशेने स्वस्थ बसून राहण्याचा स्वभाव बदलला पाहिजे. वाचकांपर्यंत आपण स्वत: पोहोचले पाहिजे. वाचकांची जिज्ञासा पूर्ण करण्यासाठी आदर्शवत कार्यप्रणालीचा आधार घेतला पाहिजे.

महाविद्यालयीन ग्रंथालयातील विचार करताना मी आमच्या ग्रंथालयाचा संदर्भ घेतला आहे.

**प्रकार :**

कार्यप्रणालींचे दोन प्रकार आहेत. १) पारंपरिक किंवा सर्वसामान्य २) आदर्शवत किंवा नावीन्यपूर्ण.

**१) पारंपरिक किंवा सर्वसामान्य (Traditional or General practices) :**

आमच्या महाविद्यालयातील पारंपारिक पद्धती अशा आहेत–

*अ) ग्रंथालय परिचय :*

- ✯ सूचना व नियमावली.
- ✯ ग्रंथालयीन कामकाज, योजना, सेवा–सुविधा यांची ओळख.

महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वरील प्रमाणे ग्रंथालयाची माहिती करून दिली जाते.

*आ) वाचन विस्तार (Reading Expansion) :*

- ✯ नियतकालिके व अवांतर वाचन साहित्याचे प्रदर्शन (Display)
- ✯ ठरावीक कालावधीत ग्रंथालयात दाखल झालेल्या वाचनसाहित्याची यादी.

ज्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकेतर अभ्यासाची गरज असते. त्यांना वाचन विस्ताराचा उपयोग होतो.

*इ) स्वतंत्र वाचन (Independent Reading) :*

- ✯ सामान्य व संदर्भ ग्रंथ उपलब्धी.
- ✯ विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी मदत.

विद्यार्थ्यांना प्रकल्प, तसेच स्पर्धा परीक्षांसाठी स्वतंत्र वाचनाची जी गरज भासते, ती याद्वारे पुरवली जाते.

*ई) ग्रंथ प्रदर्शन (Book Exhibition) :*

ग्रंथ ही ग्रंथालयाची संपत्ती असते. आपल्या ग्रंथायलातील वाचनसंपदा काय आहे, हे वाचकांना कळावे व त्यांनी त्याचा चांगला उपयोग करावा, हा ग्रंथप्रदर्शनाचा हेतू असतो.

*उ) पुस्तक पेढी योजना (Book Bank Scheme) :*

मागासवर्गीय, तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल व हुशार विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचा पूर्ण संच वर्षभराच्या वापरासाठी विनामूल्य उपलब्ध करून दिला जातो. वर्ष संपल्यावर विद्यार्थ्याने तो सुस्थितीत परत करावा, अशी अपेक्षा असते.

**२) आदर्शवत किंवा नावीन्यपूर्ण :**

आमच्या महाविद्यालयातील आदर्शवत अशा पद्धती पुढीलप्रमाणे आहेत :

| क्र. | कार्यपद्धती | ध्येय | पद्धती |
|---|---|---|---|
| १. | करिअर मार्गदर्शन | विद्यार्थ्यांमध्ये करिअर व नोकरीच्या संधी बाबत जागरूकता निर्माण करणे. | सूचना फलकावर जाहिराती, लेख प्रदर्शित करणे. नोकरदार विद्यार्थ्यांना त्यांच्या विभागीय परीक्षेसाठी मार्गदर्शन करणे. |
| २. | इंटरनेट सुविधा | माहिती प्रतिप्राप्तीसाठी अद्ययावत तंत्रज्ञानाबाबत विद्यार्थ्यांना जागरूक करणे. | विद्यार्थ्यांना इंटरनेट सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | शिक्षकांना ग्रंथ–खरेदीची संधी | परिणामकारक अशा वाचकाभिमुख सुविधेला उद्युक्त करणे. | शिक्षकवृंद ग्रंथ –विक्रेत्याला संपर्क करतो. निवड तत्त्वा वर त्या त्या विषया-तील शिक्षकांद्वारे ग्रंथ खरेदी करणे. |
| ४. | ग्रंथसहकार | आपल्या ग्रंथालयात नसलेली पुस्तके इतर ग्रंथालयांतून मिळवणे. | इतर ग्रंथालयांशी संपर्क करणे. लेखी संमती कराराद्वारे योजना राबवणे. मोठ्या ग्रंथालयाचे सभासदत्व मिळवणे उदा. B.C.Library |
| ५. | सरस्वती पूजा | शिक्षक व विद्यार्थी यांच्यात भावनिक नाते निर्माण करणे | दर शुक्रवारी शिक्षक, विद्यार्थी यांच्याद्वारे क्रमानुसार सरस्वती पूजन शिक्षक व विद्यार्थी यांचे एकत्रीकरण करणे |

**भविषकालीन प्रकल्प :**

आमच्या महाविद्यालयाने ग्रंथालयात राबवण्यासाठी खालील प्रकल्प योजले आहेत.

*१) समाजासाठी वाचन सुविधा :*

ग्रंथालयातील वाचनसाहित्याचा उपयोग समाजालाही व्हावा, यासाठी हा प्रकल्प राबवण्यात येणार आहे.पैसे कमावणे हा हेतू न ठेवता याचे नाममात्र शुल्क आकारण्यात येईल. अभ्यासक, एम.फिल. चे विद्यार्थी, माजी विद्यार्थी यांना या प्रकल्पाचा फायदा होणार आहे.

*२) विशेष साहित्य संग्रह :*

आमच्या महाविद्यालयातील ग्रंथालयाने 'ग्रंथालयशास्त्र' या विषयावरील मराठीतील साहित्य संग्रहित करण्याचे ठरवले आहे. प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी ते नाममात्र शुल्कात सर्वांसाठी उपलब्ध असेल. विशेषत: प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे विद्यार्थी, तसेच बी.लिब., एम.लिब. व एम.फिल करणे विद्यार्थी यांना याच निश्चितच चांगला फायदा होऊ शकेल.

**समारोप :**

ग्रंथालये ही अध्ययन व अध्यापन यात महत्त्वाची भूमिका बजावतात. आपल्या वाचकाची गरज भागवण्यास ती सक्षम असतात. त्यासाठी पारंपरिक, तसेच आदर्शवत कार्यप्रणालीचा ते सुयोग्य वापर करत असतात. असा वापर त्यांनी करावा ही अपेक्षा असते.

**संदर्भ :**

१) कफ्फालीकर, चित्ररेखा – इनोव्हेटिव्ह प्रॅक्टिसेस फॉर डेव्हलपिंग क्वालिटी इंडिकेटर्स, वझे महाविद्यालय, मुलुंड, मुंबई येथील परिषदेत वाचलेला निबंध, दि. १८ एप्रिल २००९.

२) लुळे, राजेश – ॲचिव्हिंग टुवर्डस् एक्सलंस : बेस्ट प्रॅक्टिसेस ऑफ शेठ ए न के टी कॉलेज लायब्ररी, वझे महाविद्यालय, मुलुंड, मुंबई येथील परिषदेत वाचलेला पेपर, दि. १८ एप्रिल २००९.

३) सिराज, निस्सा बेगम, टोटल क्वालिटी मॅनेजमेंट इन ॲकॅडेमिक लायब्ररी : लायब्ररी फिलॉसॉफी ॲण्ड प्रॅक्टिस, व्हॉल्यूम. ५(०२) (स्प्रिंग २००३)

**प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये ग्रंथपाल**
स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय,
आयरे मार्ग, दत्तनगर,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१,
भ्रमणध्वनी– ९२२४७३४०३८
smathalye42@gmail.com.

●●●

सत्य झाकण्यासाठी धारण केलेले मौन व्यर्थ असते.

पुस्तक परिचय - १

# मौनीबुवा

प्रकाशक, लेखकाने अपार कष्टाने निर्माण केलेल्या एखाद्या ग्रंथाला खरा न्याय देणारे कोण? वाचक, समीक्षक, टीकाकार, पत्रकार, परीक्षणकर्ते, संपादक इत्यादी. अनेकच जणांची आठवण व्हायला हरकत नाही, कारण न्याय देण्यात या मंडळींची भूमिका महत्त्वाची ठरते. मात्र या यादीत कधीच एक नाव येत नाही, ते म्हणजे ग्रंथपालांचे. ग्रंथपाल पुस्तकांचा प्रसार मूकपणे करीत असतात. 'प्रत्येक ग्रंथाला वाचक' व 'प्रत्येक वाचकाला ग्रंथ' या सूत्रांसाठी ग्रंथपाल खूप त्रास घेतात, पण त्यांच्या या कार्याची कोणी दखल घेताना दिसत नाही. ग्रंथांना खरा न्याय ग्रंथालयाद्वारेच मिळू शकतो. जतन-संरक्षण आणि वितरण या त्रिसूत्रांनी ग्रंथांना मिळणारा न्याय सर्वस्वी भिन्न आहे; तरीही 'खास' न्याय देणारे 'ग्रंथपाल' संख्येने कमी असले तरी, नाहीत असे नाही. सावंतवाडीचे प्रा. जी. ए. बुवा हे या गटात मोडतात.

ग्रंथांना 'खास' न्याय देणारे जे ग्रंथपाल आहेत त्यांची वैशिष्ट्ये तरी कोणती? याचा शोध घ्यायचा ठरवले तर तोच एक संशोधनाचा विषय ठरेल. प्रत्येकी न्यारी तऱ्हा. कोणी ग्रंथप्रेमी, कोणी वाचनप्रेमी, कोणी संशोधकाचा सखा - मित्र - सोबती, कुणी अलोट प्रेम करणारा तर कुणी संदर्भ सेवा तत्काळ देणारा, तर कुणी चालता बोलता कोश, कुणी सूचीकार-कोशकार तर कुणी विद्वान - व्यासंगी. यामध्ये एक तत्त्व आहे. ते म्हणजे, त्या ग्रंथपालाजवळ ग्रंथांविषयी, अक्षरांविषयी, शब्दांविषयी अपार प्रेम असते. या अपार प्रेमाच्या तत्त्वानेच असे ग्रंथपाल ग्रंथांना 'खास' न्याय देतात. काहीतर याच्याही पलीकडे जातात. अक्षर शब्दांच्या निर्मितीची जादू घेऊनच असे ग्रंथपाल म्हणून जन्माला येतात. या निर्मितीच्या नादानेच प्रत्येक ग्रंथाच्या निर्मितीकाराच्या हृदयाचा ठाव असे ग्रंथपाल घेतात व ग्रंथांना जादूची किमया लाभते. अशा काही मोजक्याच ग्रंथपालांमध्ये प्रा. जी. ए. बुवांचा 'खास' असा समावेश होतो.

बुवा स्वत: लेखक आहेत. उत्तम संपादक आहेत आणि मौनपणे कवित्व जपणारे कवी आहेत. त्यांच्या, खरेतर, सर्वच कार्याला मौनाची भाषा आहे. ग्रंथालय चळवळ असो, कोमसाप असो बुवांच्या कार्याचा गाजावाजा नसतो. ते सार्वजनिक ग्रंथालयाचे कामही तितक्याच तन्मयतेने करतात, जितक्या दाट जिव्हाळ्याने ते महाविद्यालयाचे काम करतात. मुक्त विद्यापीठाच्या शैक्षणिक अभ्यासक्रमांना 'चौकटी'त झकास बांधण्याचे काम असो अथवा विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्याचे बिकट कार्य असो, बुवा झोकून 'देऊन' (खऱ्या अर्थाने 'देऊनच', घेऊन नाही. कारण त्यांना देणेच माहीत आहे, घेणे नाही) उतरतात; मात्र कार्य पूर्णत्वाला गेले की तिथून असे काही हळूच, नकळत, अलवार बाजूला होतात की कोणाला त्यांचे जाणे-नसणे जाणवूही नये. गाजावाजा नाही, प्रौढी नाही, मिजास नाही, कसं अगदी सहज, रक्तात असल्याप्रमाणे, पण मुखात नसल्याप्रमाणे, अगदी मौनत्त्वाचं व्रत घेतल्यागत, मौनीबुवाच जणुकाही!

अशा बुवांचा कविता संग्रह प्रकाशित होतोय म्हटल्यावर उत्सुकता ताणली गेली. का? तर आतातरी काही गवसेल, कळेल असे वाटले म्हणून. कविता हृदयातून येते, हृदयाचे नाते घेऊन, म्हणून काही सापडेल असे वाटत होते तर, त्यांच्या कवितांनाही 'मौना'चीच भाषा येते. ही मौनाची भाषा अशी की या संग्रहाला कवीचे मनोगत नाही, कवीचा परिचय नाही, कवीची संगतवार जाणकारी होईल अशी प्रस्तावना नाही. केवळ कविता आणि फक्त केवळ कवितांचे निनादणारे शब्दच इथे दिसतात, भेटतात आणि भिडतात. या शब्दांतूनच आपण जाणून घ्यायचे सारे सारे.

कवी मौनाविषयी मात्र बोलतो, पण ते कोणाच्या मौनाविषयी? स्वत:च्या नव्हे, तर 'माणूस' नावाच्या तमाम

प्राण्याविषयी. ''आपलीच वाट आपणच तुडवताना या वाटेवर कधीतरी माणूस प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मौन होत जातो व हेच त्याच्या जाणीवेचे खरे रूप'' असे कवीला वाटते. यातून तो स्वत:ला वजा करत नाही, पण जमेसही धरत नाही. असे जमेस न धरणे, हेच या 'बुवा' नावाच्या माणसाचे आदि कर्तव्य असते व ते त्यालाच, केवळ त्यालाच, जमू शकते.

माणूस माणसाला चकवा देऊ शकतो, पण कवितेला, कवितेच्या आतल्या गाभ्यातल्या शब्दांना चकवा देऊ शकत नाही. बुवांच्या कविता आपल्याला चकवू शकत नाहीत. त्या सांगत राहतात ह्रदयाची, अस्वस्थ मनाची कहाणी, बोचऱ्या वेदनेची वाणी, खुपऱ्या प्रसंगांची दहशत गाणी, अलवार वेड्या ओल्या मनाची बोलावणी. भाषा मौनाची असली तरी, तिचा गाभा वेदनेचा आहे; पिचल्या गेलेल्या नासल्या गेलेल्या दांभिक वृत्तीला चिमटीत पकडणाऱ्या संवेदनेचा आहे.

संग्रहाच्या शीर्षकातच याचा प्रत्यय येतो. कवी या साऱ्या संवेदनांच्या रूप अरूपात उमटत राहतो आणि त्याचे होतात व्रण. हे व्रण मात्र मौनी असतात की ते खास मौन धारण करतात? व्रण ओले असताना दिसत नाहीत. जखमेत, रक्तात माखलेले वाटतात-असतातही. जखम बरी झाली, वाळली, सुकली की व्रण दिसायला लागतात, अगदी आयुष्यभर सोबत करतात, त्यांच्या आठवणी सारखी किंवा कधी कधी तर जन्मखुणे सारखीही! कवीचे व्रण मौन आहेत, यातच त्याच्या भळभळत्या रक्ताची, वेदनेची जाणीव बोलत राहते.

कवीच्या मनावर उमटलेले 'व्रण' मौन असले व ते आपल्याशी बोलत असले तरी, कवीला ते मौनच राहावेत असे वाटते आहे. परंतु कवीचे 'मौनव्रत' 'मौनव्रण' होऊन अंतरीच्या खुणा सांगत राहतात. त्याच्याच कविता होतात आणि 'व्रणातून ओघळणारे रक्त पुसत' (पृ. ४४) कवी तसाच पुढे निघून जातो. न सांगता - न बोलता.

प्रा. बुवा माणसांचे लोभी. स्वत: लोभस आणि त्यात पुन्हा जीव लावणारे, जीव टाकणारे. त्यांच्या कवितेतून भेटणाऱ्या दुर्गाबाई भागवत, विद्याधर भागवत, वसंत सावंत, लिंकन, गांधी आणि बुवांचा ज्यांच्यावर फारच लोभ आहे असे अण्णा हजारे, अशा अनेक व्यक्तींविषयी लिहिताना कवी भाव कवितेची मानसिकता टिकवून ठेवतो. ती कविता व्यक्तिगत-खाजगी होत नाही. किंवा सामाजिक ऋण मोकळे करणारी आदर्शाची भेंडोळी केली जात नाही.

मातीच्याच पायाचे सारेच असल्याने, कोणासमोर झुकावे असा प्रश्न कवीला पडतो, मुलांनी का व कशासाठी शिकायचे असा तळमळीचा सवाल तो करतो, विठ्ठल सखाकृष्ण, नारायण, सत्यप्रिय हरिश्चंद्र, अशा महान मोठ्या विभूतींच्या दर्शनात त्याला विविधांगी सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणवादी दर्शने घडतात. एक अज्ञात 'तो' त्यांच्या कवितेत उमटत राहतो. (उदा. 'वाट' पृ. ५८) तो कोण, कुठला कळत नाही, पण प्रश्न करतो आणि उत्तरे मागतो. कधी त्याला कवी प्रश्न करतो आणि निरुत्तर होतो. बुवांच्या कवितांमधले हे 'प्रश्नोपनिषद' तात्त्विक पातळीला स्पर्श करते.

'मी वाघ आहे', 'पक्ष आणि पक्षी', 'आजही आम्ही भगते आहोत', अशा काही कविता म्हणजे मुळावरच आघात करणाऱ्या आहेत. त्या वाचूनच अनुभवणे उत्तम!

१०५ पृष्ठांचा, देखण्या मुखपृष्ठाचा आणि सुरेख कागद-छपाईचा हा संग्रह वाचनीय आहे. वस्तुत: तो आधीच प्रकाशित व्हायला हवा होता. वाचक या संग्रहाचे स्वागत करतील. बुवांचे अभिनंदन!

**प्रा. डॉ. प्रदीप कर्णिक**
फ्लॉवर व्हॅली, नारळी पाडा,
हायवे, ठाणे

●●●

पुस्तक परिचय - २

# जीवनानुभव व्यक्त करणाऱ्या कविता

संवेदनशीलता हे कवीचे व्यवच्छेदक लक्षण असते. कधी ते आत्मपर असते तर कधी समाजाभिमुख. नवोदित कवी श्रीनिवास आठल्ये यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'सैलावलेलं आत्मभान' या कविता संग्रहात ही दोन्ही रूपं प्रकर्षानं जाणवतात.

अतृप्ती आणि नव्या अनुभवाची ओढ याचे श्रीनिवास आठल्ये यांना आकर्षण वाटते. तरलता व श्रद्धाळू मन हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे खास विशेष आहेत. श्रद्धा इतकी की ते माणसांत देव शोधतात तर देवात तारणहाराचे व्यक्तित्व अनुभवतात. सुख असो किंवा दुःख ते नेहमीच त्याचा परमोच्च बिंदू शोधण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच,

यदा प्रेम सौंदर्यवती तव साहतो...
खरी देवमूर्ती तुझियातचि पाहतो!

किंवा

कल्पना सुखाची अता मावळून गेली,
भाग्यचंद्रिकाही बिचारी ढळून गेली

अशा परस्परविरोधी रचना ते सहज लिहून जातात. एकीकडे,

आईच्या गत आठवणींचा
श्रावण मेघ बरसतो आहे

किंवा

अंगाई गायिल्याविना
माय, का ग, तू निजली?

अशा आईबद्दलच्या भावना करुणोत्कट शब्दांत त्यांनी व्यक्त केल्या आहेत. तर दुसरीकडे,

पीत आसू जगायचे कुठवरी हे?
जीवन त्याग हेच पाणचट आता!

किंवा

वाडगा माझा रे, रिकामा!
दैव तो ही लाटून गेले!

अशा वैयक्तिक भावनाही हळुवारपणे त्यांच्या कवितांतून डोकावताना दिसतात.

पूर्वसूरींबाबत त्यांच्या मनात आदर व अभिमान आहे. म्हणूनच,

माझ्या मनाला अता फार वाटे
म्हणूनीच काव्ये तुझी गाविशी!

असे सावरकरांबद्दल किंवा,

'गोविंदाग्रजां' स सर्वदा नम्र प्रणाम
श्रीनिवास करी!

असे गडकऱ्यांबद्दल ते सहजपणे लिहून जातात.

स्वतःचे आत्मभान तरलतेने जपणारे श्रीनिवास आठल्ये समाजाबाबतच्या सैलावलेल्या आत्मभानाने व्यथित होतात. त्याचे पडसाद पूर्णांशाने त्यांच्या कवितांमधून जाणवत राहतात.

या कविता संग्रहात विविध विषयांवरील एकूण ४१ कवितांचा समावेश आहे. सर्वच कविता वाचनीय आहेत. दिशाचे कार्यकारी संपादक प्रा. मोहन पाठक यांची विवेचक प्रस्तावना त्यास लाभली आहे. शेवटी शीर्षक निर्देश, वर्षानुसार नोंद, पूर्व प्रसिद्धीची नोंद, चरणसूची देऊन अभ्यासकांची सोय केलेली आहे. प्रस्तुत कवी हा

ग्रंथपालही असल्याने पुस्तकाचा वर्गांक व तालिकापत्रही देण्यात आले आहे. मुग्धा प्रकाशन, डोंबिवली यांनी हा ६० पृष्ठांचा कविता संग्रह अवघ्या ५० रुपयात उपलब्ध करून दिला आहे.

- सैलावलेलं आत्मभान
- प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये
- मुग्धा प्रकाशन, डोंबिवली
- पृष्ठे – ६०
- मूल्य – रु. ५०/-

**श्री. दीपक संगीत**
मुलुंड, मुंबई

●●●

**सैलावलेलं आत्मभान**



**मुखपृष्ठ ाचे चित्र**

(पृ. १६ वरून)

## आधुनिक कर्मयोगी – पू. पांडुरंगशास्त्री आठवले

आजकाल आधुनिकतेच्या नावाखाली क्रौर्य, स्वार्थ अर्थकेंद्रितता, तत्त्वशून्यता, भावनाशून्य यांत्रिक संबंध आणि भयभीतता यांत माणूस आणि संपूर्ण समाजच अतिशय वेगाने भरडला जात आहे. हे विपरीत चित्र पाहून कोणीही विचारी माणूस हताश न होईल, तरच नवल. हेच काय माणसाचे जीवन की, जिथे भाव, प्रेम, आत्मीयता निःस्वार्थता यांचा लवलेशही दिसत नाही? हेच का मानव्य? जिथे धर्म, जात, इत्यादींमुळे भेदांच्या दऱ्या वाढत आहेत याचबरोबर द्वेष, मत्सर आणि सूडभावनांचा अविष्कार क्षणोक्षणी घडतो आहे? हीच का मानवता की, जिच्यात खाण्या-पिण्या आणि नाचण्यापलीकडच्या जीवनाचा विचारही मनाला स्पर्श करीत नाही? अशा अनेक प्रश्नांनी व्यथित होत असतानाच या समाजात आशेचा केवळ किरणच नाही, तर तळपता तेजस्वी सूर्यच पु. पांडुरंगशास्त्री आठवलेंच्या रूपाने स्वाध्याय परिवारामार्फत या देशाला आधुनिक युगपुरुषाच्या रूपाने मिळाला, असे म्हणता येईल.

१९ ऑक्टोबर हा पु. पांडुरंगशास्त्रीजींचा वाढदिवस. परंतु या दिवसालाही या महामानवाच्या रूपाने मनुष्याचा गौरव प्राप्त झाला. म्हणूनच, सर्व स्वाध्यायी परिवार हा दिवस 'मनुष्य गौरव दिन' म्हणून साजरा करतो. अस्पृश्य म्हणून हिणवलेल्या समाजाला बंधुत्वाच्या नात्याने जोडणारे शास्त्रीजी अबलांना सबलतेची साक्ष पटवून देणारे शास्त्रीजी आणि तरुणांमध्ये सृजनशक्ती निर्माण करणारे शास्त्रीजी म्हणजे भगवंताने या विश्वाला दिलेली एक अमूल्य भेट असेच म्हणावे लागेल.

**श्री. शशिकांत गाणार**
स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय,
डोंबिवली (पूर्व) – ४२१२०१.

●●●

पुस्तक परिचय – ३

# ग्रंथसामर्थ्याचा अनोखा अभ्यास : ग्रंथसामर्थ्य

शुद्ध तत्त्वज्ञान आणि खऱ्या परमार्थाचा प्रसार या हेतूने रौप्य महोत्सवी वाटचालीपर्यंत सुमारे २०० पुस्तके प्रकाशित करणारी संस्था दुर्मीळच म्हणावी लागेल. या २०० पुस्तकांतील अनेक पुस्तकांच्या तीन-तीन, चार-चार आवृत्त्या निघाल्या; कन्नड, हिंदी, इंग्रजी या भाषांमध्ये त्यांची भाषांतरे झाली हे तर त्याहूनही विशेष आहे. 'श्री वामनराज प्रकाशन संस्था' ही ती संस्था होय. उपरोक्त प्रेरणा संस्था स्थापन करणारे श्री संत मामासाहेब देशपांडे यांची होती.

असे भरीव योगदान असणाऱ्या प्रकाशन संस्थेचा सर्वांगीण अभ्यास करायचा, तिच्या प्रकाशनांसंबंधी व प्रकाशन कार्यासंबंधी सखोल चिंतन करायचे हे अतिशय अवघड, आव्हानात्मक ठरेल असे काम आहे. मराठीतच नव्हे तर इतर कोणत्याही भाषेत प्रकाशन संस्थेच्या योगदानाचा असा संशोधनपर आढावा घेणारे लेखन अभावानेच असेल. याचे कारण हे आव्हान पेलण्यासाठी लागणारी साक्षेपी वृत्ती व व्यासंग हे आहे.

परंतु या वर्षी झालेल्या गुरुपौर्णिमेला प्रवचन प्रसंगी प्रकाशित झालेल्या 'ग्रंथसामर्थ्य' या आपल्या ग्रंथातून डॉ. प्रदीप कर्णिक यांनी असा चोखंदळ अभ्यास सादर केला आहे. डॉ. प्रदीप कर्णिक हे अनुभवी ग्रंथपाल तर आहेतच, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे ग्रंथांचे सामर्थ्य जाणवलेले साक्षेपी ग्रंथ प्रेमी, वाचक आहेत. त्यामुळे या विषयावर लेखन करण्याचा त्यांचा अधिकार मोठा आहे. या ग्रंथाच्या प्रास्तविकामध्ये माननीय शिरीषदादा कवडे यांनी नमूद केलेल्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास ''डोळस वाचन, सश्रद्ध चिंतन, समतोल दृष्टी, चोखंदळ अर्थग्राहीत्व आणि दिलखुलास, प्रामाणिकपणा'' या डॉ. कर्णिक यांच्यातील वैशिष्ट्यांचा प्रत्यय ग्रंथात पानोपानी येतो.

या ग्रंथाबद्दल आणखी एक विशेष जाणवला व तो सुरुवातीलाच सांगावा लागेल, तो म्हणजे 'डिंपल पब्लिकेशन्स' या प्रकाशन संस्थेने हे पुस्तक काढले आहे. दुसऱ्या प्रकाशन संस्थेचा अभ्यास प्रकाशित करण्याचा मोठेपणा 'डिंपल' ने दाखवला याचे कारण त्यांनाही या अभ्यासाचे मोल पटले आहे, हेच आहे. डिंपल प्रकाशनाच्या उत्तमोत्तम ग्रंथांच्या परंपरेतून त्यामुळेच महत्त्वाचे असे अनेक ग्रंथ मराठी साहित्याला प्राप्त झाले.

ग्रंथसामर्थ्य या ग्रंथात एकूण सात लेख व तीन परिशिष्टे आहेत. हे लेख यापूर्वी विविध नियतकालिकांतून प्रकाशित झाले आहेत. 'मराठी वाङमयेतिहास आणि प्रवचनादी साहित्य' असा त्यातील एक लेख आहे. या लेखातील मुद्याचा आवर्जून उल्लेख करायला हवा. साहित्य इतिहासाचे लेखन हा फार गहन विषय आहे. अशा इतिहास लेखनात विचारात घेतले गेलेलेच नाही असे कितीतरी साहित्य दुर्लक्षित राहिले आहे. डॉ. प्रदीप कर्णिक यांनी याच दृष्टीने प्रवचन, कीर्तन या अविष्करण घाटांचा अतिशय मर्मग्राही आढावा या लेखातून घेतला आहे. या इतिहासाची दखल घेणाऱ्या लेखकांचे तपशील डॉ. कर्णिक देतात. तरीही ''दोन शतकांची आणि उत्तमोत्तम प्रवचनकारांची परंपरा असणाऱ्या या व्यासपीठावरील साहित्याची मराठी वाङमयाच्या इतिहासाने दखल का घेऊ नये?'' हा प्रश्न त्यांनी मांडला आहे. (पृ. २२) या प्रश्नाच्या अनुषंगाने त्यामागील कारणे, 'श्री वामनराज प्रकाशन संस्थेचे' योगदान यांचा त्यांनी घेतलेला घांडोळा पुळातून वाचावा असा आहे.


या लेखांत दोन मुलाखती आहेत. ''मराठी वाङमयात श्री मामासाहेब दुर्लक्षित हे साहित्य संस्कृतीचे दुर्दैव'' (पृ. २७) व ''थोर संत श्रीमामासाहेब देशपांडे आणि

ज्ञानेश्वरी'' (पृ. ३०) या त्या मुलाखती होत. या मुलाखतींतून डॉ. कर्णिक यांचा श्रीवामनराज प्रकाशन संस्थेच्या ग्रंथांचा अभ्यास प्रभावीपणे व्यक्त झालेला आहे.

या ग्रंथामधील ''सांप्रदायिक मराठी ग्रंथ वाङमय, मराठी वाङमयेतिहास आणि श्रीवामनराज प्रकाशनाची पंचवीस वर्षे'' हा लेख म्हणजे डॉ. कर्णिक यांनी मांडलेला आदर्श संशोधनपर लेखनाचा वस्तुपाठच आह. पृ. ४४ ते ११६ या पृष्ठांमधील या लेखात त्यांनी मराठी साहित्यातील जे महत्त्वपूर्ण संदर्भ दिले आहेत त्यातून अनेक संशोधकांना प्रेरणा मिळू शकेल. ''श्रीज्ञानेश्वरांवर मराठीत जे ललित वाङमय प्रकाशित झाले आहे त्याचा एक विस्तृत आढावा, खरे तर, एखाद्या समर्थ अभ्यासकाने घ्यायला हवा'' (पृ. ६९) हे कर्णिकांचे सांगणे संत साहित्यावरील संशोधनाचे व्यापक आयाम सुचवणारे आहे. या प्रदीर्घ लेखात संत साहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने श्रीवामनराज प्रकाशन संस्थेच्या योगदानाचा अतिशय मोलाचा आढावा आला आहे. उत्तम समीक्षा व अभ्यास यांचे हा लेख चांगले उदाहरण ठरेल.

'ग्रंथसामर्थ्य' या पहिल्या लेखात (पृ. ९) श्रीवामनराज प्रकाशन संस्थेची पुस्तके वाचताना जाणवत गेलेले ग्रंथ सामर्थ्य, आपली त्यापूर्वीची संत साहित्याबाबतची विचारधारा इ. अनेक विचार मांडत या प्रकाशनांशी जुळलेल्या ऋणानुबंधांचा आत्मपर अनुभव डॉ. कर्णिक यांनी मांडला आहे. मूळपाठदीपिका श्रीज्ञानदेवी (पृ. ११७) व कुंटे प्रतीच्या ओवी सूची संदर्भातील लेख (पृ. १२८) हे लेखही संशोधनपर व अभ्यासपूर्ण आहेत.

साहित्याचे अभ्यासक, संशोधक यांना महत्त्वाचे संदर्भ पुरवणाऱ्या अशा तीन परिशिष्टांचा समावेश, हे ही या ग्रंथाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. 'श्रीवामनराज' त्रैमासिकातील निवडक लेखांची सूची (पृ. १३३) 'श्री बाप रखुमादेवी वरू' या मासिकातील लेखमालांची सूची' (पृ. १४२) व 'श्री वामनराज ग्रंथ प्रकाशनाच्या ग्रंथांची सूची' (पृ. १४३) अशी ही परिशिष्टे आहेत.




मोराच्या पिसाच्या पार्श्वभूमीवर काढलेले ग्रंथाचे मुखपृष्ठ (चित्रकार : अनिल दाभाडे) लक्ष वेधून घेणारे आहे. प्रकाशनसंस्थेच्या वाटचालीचा हा संगोपांग अभ्यास वाचकाला संत साहित्योन्मुख करणारा असा झाला आहे.

ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाचे नियतकालिक 'दिशा', अक्षरवेल, ललित, सकाळ, ज्ञानगंगोत्री या नियकालिकांतून हे लेख यापूर्वी प्रकाशित झालेले आहेत. तसा तपशील प्रत्येक लेखाखाली देण्यात आला आहे.

डॉ. प्रदीप कर्णिक यांचे या साक्षेपी अभ्यासात आधारित ग्रंथाबद्दल विशेष अभिनंदन!

- ग्रंथसामर्थ्य – कर्णिक, प्रदीप
- वसई, डिंपल पब्लिकेशन्स, २००९ (गुरुपौर्णिमा)
- पृ. १५१ ❉ मूल्य : रु. १५०/– फक्त
- डिंपल पब्लिकेशन्सचा इ मेल – dimplepublicunonerediffmaicom.

**मोहन पाठक**
ठाणे

●●●

सर्व खचले तरी चालेल, धीर खचू देऊ नये.

साहित्य – जगत

# डॉ. भीमराव सदाशिव कुलकर्णी यांचा ऋग्वेदाचा मराठी शास्त्रीय अनुवाद ग्रंथराज

डॉ. भीमराव सदाशिव कुलकर्णी (१२, सुदर्शन को. ऑ. हौसिंग सोसा., चित्तरंजनदास रोड, रामनगर, डोंबिवली – पूर्व जि. – ठाणे – ४२१२०१) यांना शासनाने महाराष्ट्र राज्य महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कारातील वेदमूर्ती हा पुरस्कार दिलेला आहे. विज्ञानाची किनार असलेल्या ऋग्वेदाचा मराठी शास्त्रीय अनुवाद (एकूण ५ खंड; एकूण पृष्ठे सुमारे ४३२०) या ग्रंथराजासाठी त्यांना हा पुरस्कार मिळालेला आहे. (केंद्र शासनाच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य शासन दरवर्षी संस्कृत विषयात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील सात व परप्रांतातील एक अशा संस्कृत पंडितांना देते)



**डॉ. भीमराव सदाशिव कुलकर्णी**

**गुरुचा कानमंत्र ६८ वर्षांनंतर शिष्याने प्रत्यक्ष कृतीत उतरविला :**

डॉ. भीमराव कुलकर्णी यांचे वय ८७ आहे. त्यांचे एम्. एस.सी. पी. एच्. डी. पर्यंत शिक्षण झालेले आहे. ते मूळचे वाईचे. वडील संस्कृत आणि गणिताचे शिक्षक मुंबईतील शेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालयात ते प्रध्यापक होते. १९४० च्या दरम्यान शालेय शिक्षण चालू असतांना डॉ. कुलकर्णी यांचे संस्कृत शिक्षक गोटखिंडीकर शास्त्री हे संस्कृत शिकवीत असताना प्रत्येक विद्यार्थ्याला ऋग्वेदाचे महत्त्व विशद करीत असत. ते म्हणत,''ऋग्वेद हा आपल्या संस्कृतीचा ठेवा आहे. त्यामध्ये ज्ञान, विज्ञान ठासून भरलेले आहे. पुढील आयुष्यात ज्या विद्यार्थ्याला जमेल तसे व जमेल तेव्हा त्याने ऋग्वेदाचा सखोल अभ्यास करावा व त्यातील विज्ञान सामान्य माणसाला कळेल अशा मराठीतून जगासमोर ठेवावे ''निवृत्तीनंतर आराम करण्याऐवजी गोटखिंडीकर शास्त्री यांचा शब्द खरा करून दाखवायचाच डॉ. कुलकर्णी यांनी ध्यास घेतला. याच काळात धार्मिक कार्य करणारे गुरुजी कै. नानाशास्त्री लेले यांनी त्यांना विनंती केली, ''डॉक्टरसाहेब, मी केवळ पोपटपंची करून सूक्त म्हणतो, इतरांना शिकवितो. पण त्यातील ऋचेचा अर्थ मला माहीत नाही. हे सर्व भांडार जर मराठीत तुम्ही आणलेत तर एक मोठे काम तुमच्या हातून होईल. ते तुम्ही कराच!'' आणि मग डॉक्टरसाहेब जोमाने कामाला लागले. पं. सातवळेकरांनी संपादित केलेली 'ऋग्वेदाची संहिता' अनुवादासाठी त्यांनी घेतली. त्यासाठी पुणे येथील सावळेकर ट्रस्टचे आप्पासाहेब कुलकर्णी यांनी अनुवादास तात्काळ परवानगी दिली आणि मग आठ-दहा वर्षांच्या अखंड परिश्रमाने त्यांनी ऋग्वेदातील १० हजार ५५२ संस्कृत ऋचांचा मराठीत अनुवाद केला. सातवळेकर ट्रस्टने (११७०/१९, रिव्हेन्यू कॉलनी, शिवानी नगर, पुणे – ४११००५) पहिला खंड प्रसिद्ध केला (नंतरचे २ ते ५ खंड आयडियल रोड बिल्डर्सचे श्री. द. पा. म्हैसकर यांनी प्रसिद्ध केले) अशा प्रकारे, ६८ वर्षांनंतर गुरुचा कानमंत्र डॉ. कुलकर्णी यांनी प्रत्यक्ष कृतीत उतरविला.

**ग्रंथाची वैशिष्टचे :**

ऋग्वेदाचा मराठी शास्त्रीय अनुवाद हा अमोल ठेवा साकारताना ऋचांतील पारंपरिक भाषा त्यांनी कटाक्षाने टाळली. (हा अनुवाद करताना त्यांना शालेय संस्कृत व्याकरण व ऋग्वेदांत ऋचात वापरलेले व्याकरण यांचा

खूप फरक असल्याचे आढळून आले. पाणिनीपूर्व व्याकरण अभ्यासल्याशिवाय ऋग्वेदाचा अनुवाद शक्य नाही म्हणून त्यांनी पुणे येथे जाऊन अभ्यास केला. त्यासाठी मार्गदर्शन घेतले. डॉ. भीमराव या ग्रंथाचे वैशिष्ट्य सांगताना म्हणतात, ''जगामध्ये विसाव्या शतकात लागलेले शोध औद्योगिक, वैज्ञानिक, वैद्याकीय प्रगतीचे मूळ ऋग्वेदामध्ये आहे. भौगोलिक सामाजिक बदलांची मांडणी, कृत्रिम पाऊस, धरणे, जहाज, विमान बांधणी, आकाशासंचार, दूरसंचार आदी शोधांचे मूळ हे ऋग्वेदामध्ये आहे. ऋग्वेदातील काही ऋचा या इंद्र, अग्नी, विग्वेदेव, काही समाज प्रबोधनासाठी केल्या आहेत. ऋग्वेदातील निरनिराळी सूक्ते जरी विविध देवतांसाठी असली तरी ती प्रत्यक्षात भूलोकावरील आदिशक्ती, सौरशक्ती आदी शक्तींचीच ती रूपे आहेत. अगस्ती आणि वशिष्ठ ऋषी हे परपस्पर विरुद्ध टोकाला राहूनही एकमेकांशी संवाद साधत याची ऋग्वेदात नोंद आहे. म्हणजे सध्याची मोबाईल, व्हिडीओ कॉनव्हर्सिंग सेवेची मांडणी हजारो वर्षापूर्वीच झाली होती. इंद्राच्या गायी चोरीला गेल्यानंतर कृपण व्यापाराचा शोध घेण्यासाठी शुनी कुत्रीचा (सरमा) वापर करण्यात आला होता. आता गुन्हा शोधण्यासाठी पोलीस कुत्र्यांचा वापर करतात म्हणजे कुत्र्याला वासाचे सर्वाधिक ज्ञान आहे याचा उल्लेख ऋग्वेदात आहे. गाव, शहरांची रेखीव मांडणी, धान्यनिर्मिती, औषधनिर्मिती, वनस्पती आदी हजारो विषय ऋग्वेदात आढळतात. हे सर्व विषय मी साध्या सोप्या भाषेत मराठीतून उदाहरणासह या ग्रंथात मांडले आहेत''

**ज्ञानवंतांसह सामान्यजनांनी केला अभिनंदनाचा वर्षाव :**

या महान कार्यासाठी शंकराचार्यांनी कुलकर्णी यांना 'ऋग्वेदकार' या नावाने सन्मानित केले आहे. संस्कृत पंडित गुलाम दस्तगीर अ. बिराजदार यांनी त्यांचा 'वेदमूर्ती' म्हणून गौरव केला आहे. फुलगाव येथील स्वामी स्वरूपानंदांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे. गेल्या दोन वर्षात महाराष्ट्रासह देश-परदेशाहून हजारो नागरिकांनी वाचकांनी त्यांचे दूरध्वनीवरून अभिनंदन व गौरव केलेला आहे. 'दिशा' तर्फे ही डॉ. कुलकर्णी यांना मनःपूर्वक धन्यवाद.

**इतर सन्मानित संस्कृत पंडित :**

पं. शिवप्पा नागनाथ रक्के (परभणी) व वासुदेवराव चोरघडे (नागपूर) यांना प्राचीन संस्कृत पंडित या उपाधीने सन्मानित करण्यात आले आहे. ह. भ. प. कृष्णराव लिमये (नागपूर), प्रा. लीला अर्जुनवाडकर (पुणे) यांना संस्कृत प्राध्यापक डॉ. उज्ज्वला चंद्रकांत थत्ते (दादर) यांना संस्कृत कार्यकर्ता आणि प्रा. डॉ सुभाष वेदालंकार (जयपूर) यांना संस्कृत पंडित या उपाधीने गौरविण्यात आलेले आहे. अधिक माहिती आणि ऋग्वेद विक्रीकरीता संपर्काचे पत्ते -

१) अनुवाद - डॉ. भीमराव कुलकर्णी -

पत्ता वरील प्रमाणे

२) प्रकाशक - श्री. दत्तात्रय पांडुरंग म्हैसकर -

म्हैसकर फाउण्डेशन विश्वस्त निधी,

महात्मा गांधी मार्ग, डोंबिवली (प.)

३) श्री. द. कृ. जोशी / श्री. श्रीपाद तपस्वी -

गीताधर्म मंडळ, पेरू गेटाजवळ सदाशिव पेठ, पुणे

- सवलत योजना - भाग १ ते ५
- प्रत्येक खंडाची किंमत रु. ७५०/-
- ५ खंडाची मिळवून मूळ किंमत ३७५०/-
- सवलत मूल्य रु. ३०००/-

अनीती आणि भीती या एकत्रच येतात.

- वाचनालयांना विशेष सूट मिळेल
- संच पोस्टाने पाठविण्यात येईल
- पोस्टेज खर्च वेगळा आकारण्यात येईल.

**पॉप्युलर प्रकाशन आणि 'प्रिय रसिक' :**

पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. (३०१ महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई - ४०००२६) ही मराठी साहित्यातील एक मान्यवर प्रकाशन संस्था. १९३४ मध्ये संस्थेची स्थापना झाली. आजवर संस्थेने मराठी व इंग्रजी मिळून दोन हजाराहून अधिक पुस्तके प्रकाशित केलेली आहेत. (जी.ए. कुलकर्णी, वसंत कानेटकर, कुसुमाग्रज, विजय तेंडुलकर, गंगाधर गाडगीळ, विंदा करंदीकर, धनंजय कीर(चरित्रकार), वसंत आ. डहाके, मालती बेडेकर, विश्राम बेडेकर, गो. पु. देशपांडे, श्याम मनोहर, डॉ. भा. ल. पाटील, ज्योत्स्ना देवधर, ना. ल. कुलकर्णी, धर्मानंद कोसंबी इ इ. शेकडो लेखकांची आणि इंग्रजी मधील अनेक विषयांवरील नामवंतांच्या गाजलेल्या असंख्य पुस्तकांचा त्यात समावेश आहे.) नामवंत लेखकांच्या उत्तमोत्तम पुस्तकांच्या संपूर्ण संचांची अनेक पुनर्मुद्रणे करण्यात तर पॉप्युलरचा हातखंडा आहे. मराठी व इंग्रजीतील असंख्य वाचकांच्या हृदयात पॉप्युलरने मानाचे स्थान पटकाविले आहे. ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे. पॉप्युलरचे मनःपूर्वक अभिमान.

**'प्रिय रसिक' पॉप्युलरची गृहपत्रिका :**

पॉप्युलर प्रकाशनाच्या मराठी विभागाच्या पहिल्या संपादक मृदुला जोशी 'प्रिय रसिक' च्या २०० व्या अंकानिमित्ताने (ऑगस्ट २००९) कार्यकारी संपादक अस्मिता मोहिले यांना लिहिलेल्या पत्रात, ''गृहपत्रिका'' दर महिन्याला काढावी ही कल्पना मला वाटतं सतरा वर्षापूर्वी तरी अतिशय नावीन्यपूर्ण असेल! मी १९७२ पासून पॉप्युलरच्या मराठी पुस्तकांची संपादक म्हणून काम करीत असल्यामुळे, कुठेही गेले तरी चोखदळ वाचकांचा कायम प्रश्न असायचा'' त्यांना सविस्तर उत्तर द्यायचं तर अशाच प्रकारे एकखादी गृहपत्रिका काढायला हवी हे रामदासांच्या मनात केव्हापासून होतं. पण ते प्रत्यक्षात यायला १९९२ साल उजाडावं लागलं. आज मात्र 'प्रिय रसिक' ची प्रतिष्ठा एवढी वाढलेली आहे कीं पॉप्युलरच्या नव्या पुस्तकांइतकीच वाचक 'प्रिय रसिक' चीही आतुरतेने वाट बघत असतात. एवढंच नाही तर, मराठीतल्या इतर नावाजलेल्या प्रकाशन गृहांनीही आता आपापली गृहपत्रिका काढायला सुरुवात केली आहे त्यामुळे रामदासांची ही कल्पना किती योग्य आणि आवश्यक होती हे सिद्धच झालं आहे.

''ह्या दोनशे अंकांतून अनेक सुंदर सुंदर कल्पना राबवल्या गेल्या आहेत. पॉप्युलरचा इतिहास वर्तमान आणि भवितव्य, सगळं सगळं त्यातून व्यक्त होतयं. रामदासांची दीर्घ मालिका 'आनंदयात्रा', पांडुरंग कुमठांच्या व सदानंद भटकळांच्या आठवणी, यातून पॉप्युलरचा ७५ वर्षांचा इतिहास उलगडत गेला, सध्या चालू असलेली 'आदली पाने', मधली 'पाने' आणि 'पुढली पाने' यातून तर भूत-वर्तमान-भविष्य या सगळयांचाच वेध घेतला जातो आहे. शिवाय दर महिन्याला आपल्या मोठमोठ्या लेखकांना मिळणारे पुरस्कर, नवीन येऊ घातलेल्या पुस्तकांची माहिती याविषयीचा मजकूर ह्यामुळे मराठी साहित्य-विश्वाच्या इतिहासाचा एक सलग मागोवाच जणू काही ह्या या अंकांतून घेतला गेलेला आहे. मला सर्वात कौतुक आणि आनंद वाटते ते म्हणजे ह्याला कुठेही पॉप्युलर प्रकाशनाच्या जाहिरातींचा वास येत नाही. 'प्रिय रसिक' च्या साहित्यिक आणि सांस्कृतिक महत्वाचं तुम्ही सर्वांनी फार उत्तम भान राखलेलं आहे. तुम्हां सर्वांना मनापासून धन्यवाद.''

'प्रिय रसिक' च्या दोनशे अंकानिमित्ताने पॉप्युलरने एक विशेष योजना जाहीर केलेली आहे. ती अशी - आपण

रु ५००/- रु एकरकमी भरून मित्रमंडळाचे सभासदत्व घेऊ शकता. त्यानंतर २०१५ पर्यंत आपल्याला 'प्रिय रसिक' चे पुढील ६४ अंक नियमितपणे पाठविले जातील. मधल्या काळात सभासदत्व वर्गणीमध्ये झालेल्या वाढीचा परिणाम या सभासदांच्या सभासदत्वावर होणार नाही. पॉप्युलर मित्रमंडळ सभासदांना दरमहा नियमितपणे 'प्रिय रसिक' पाठविला जाईल. तसेच पॉप्युलरच्या विविध योजना, प्रकल्प, समारंभ याविषयीची माहिती नियमित कळविली जाईल. पॉप्युलर मित्रमंडळ सभासदांना पॉप्युलर प्रकाशनाची पुस्तके विशेष सवलतीत आपला सभासद क्रमांक सांगून संस्थेच्या विक्री कार्यालयाकडून विकत घेता येतील. तसेच प्रदर्शनात, संमेलनात पॉप्युलरच्या स्टॉलवरूनही ही खरेदी करता येईल. आपली वर्षभरातील पॉप्युलर पुस्तकांची खरेदी रु. २५००/- किंवा त्याहून जास्त झाल्यास रु. ५००/- ची आपल्या पसंतीची पॉप्युलरची पुस्तके भेट म्हणून देण्यात येतील.

अधिक माहिती हवी असल्यास लेखाच्या सुरुवातीस उल्लेखिलेल्या पॉप्युलर प्रकाशनाच्या पत्त्यावर संपर्क साधावा. पुनश्च एकदा पॉप्युलर प्रकाशन व प्रिय रसिक मासिकाचे अभिनंदन व शुभेच्छा.

**'सार्थ श्रीज्ञानेश्वरी' (विवरणकार वामन देशपांडे) प्रसिद्ध होणार! माऊलीच्या परमभक्तांना आणि समस्त वारकऱ्यांना नम्र आवाहन :**

संतश्रेष्ठ ज्ञानदेवांनी नेवाश्याला १२९० साली मराठी भाषेत प्रथमच जे अप्रतिम गीताभाष्य केले त्याला जागतिक वाङ्मयात तोड नाही. या अदभुत ग्रंथावर आजवर अनेकांनी भाष्य केलेले आहे. १८४५ साली या अद्वितीय ज्ञानेश्वरीची पहिली मुद्रित प्रतप्रकाशित झाली. गेल्या दीडशे वर्षात ज्ञानेश्वरीच्या अनेक संपादित आवृत्या प्रकाशित झाल्या. बाळकृष्ण अनंत भिडे यांची १९२८ साली प्रकाशित झालेली जी सार्थ ज्ञानेश्वरी होती त्या सार्थ ज्ञानेश्वरीने अनेकांची मने जिंकून घेतली. त्यानंतर साखरे महाराज, सोनोपंत दांडेकर यांच्या सारख्या अनेक माऊली भक्तांची सार्थ संपादने प्रकाशित झाली. प्रत्येक संपादकाची सार्थ विवरणाची भाषा वेगळी. परंतु प्रत्येकाने अतिशय मनःपूर्वक 'सार्थ ज्ञानेश्वरी' सिद्ध केली.

मनोरमा प्रकाशन (अनिल रघुनाथ फडके), १०२/सी, खोली नं. ११, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर, मुंबई - ४०००१४; यांनी सुद्धा दिवाकर अनंत घैसास (ए-२०१, अनंत सोसायटी नं. २, पेंडसे नगर, क्रॉसरोड नं. ५, डोंबिवली - पूर्व जि. ठाणे - ४२१२०१) यांची सार्थ ज्ञानेश्वरी २००० साली प्रकाशित केली होती. या सर्व ज्ञानेश्वऱ्या बाजारात उपलब्ध असतांनाच संत साहित्याचे गाढे अभ्यासक, संत वाङ्मयाचे लेखक वामन देशपांडे (वाल्मिक प्रकाशन, १३, प्रियदर्शिनी, अग्रवाल हॉल लेन, मानपाडा रोड, डोंबिवली - पूर्व - जि- ठाणे-४२१२०१) यांचे रसाळ भाष्य असलेली 'सार्थ ज्ञानेश्वरी' प्रसिद्ध करण्याचे निश्चित केले आहे. आजपर्यंत स्वतः माऊलीच अर्थ सांगते आहे असा भाव कुठल्याच ज्ञानेश्वरीतून प्रकट झाला नव्हता. त्यामुळे या ज्ञानेश्वरीची पृष्ठे खूप वाढली. १४५० 'डबल क्राऊन' आकाराची ही ज्ञानेश्वरी पुरेशा निधी अभावी प्रसिद्ध होऊ शकत नाही. वारकऱ्यांना ही ज्ञानेश्वरी अल्प मूल्यात उपलब्ध व्हावी म्हणून प्रकाशक अनिल फडके (मनोरमा प्रकाशन) यांची धडपड चालू आहे. कागदाच्या वाढत्या किंमती, छपाईचा बेसुमार खर्च लक्षात घेता या योजनेला अर्थसहाय्याची नितांत गरज आहे. तरी सर्व वारकऱ्यांना व माउली भक्तांना जाहीर आवाहन करण्यात येते आहे की, या ज्ञानेश्वरी प्रकल्पाला जेवढे जमेल तेवढे अर्थ सहाय्य करावे अशी अनिल फडके यांनी विनंती केलेली आहे. प्रत्येक दात्याला या ज्ञानेश्वरीची एक प्रत भेट म्हणून देण्यात येईल. किमान एक हजार रु. ची अर्थसहाय्यची अपेक्षा आहे. इच्छुकांनी उपरोक्त पत्त्यावर संपर्क साधावा.

**श्री. राघवेंद्रस्वामी यांची नित्यपठणाची पोथी :**

सौ. प्रज्ञा कुलकर्णी (आर. एम. २१, रामदत्त, १०५ मिलाप नगर, M.I.D.C.; डोंबिवली - पूर्व) यांनी श्री राघवेंद्रस्वामी यांची नित्यपठणाची पोथी (स्वामींचे ८४ ओव्यात शब्दबद्ध केलेले चरित्र) मूल्य रु. २०/- लिहिली असून संत साहित्याचे गाढे, अभ्यासक श्री. वामनराव देशपांडे यांच्या वाल्मीक प्रकाशनाने (१३, 'प्रियदर्शिनी', अग्रवाल हॉल लेन, मानपाडा रोड, डोंबिवली - पूर्व - ४२१२०१) ती प्रसिद्ध केलेली आहे. वाल्मीक प्रकाशनाचे हे रौप्यमहोत्सवी प्रकाशन आहे.

**परममित्र प्रकाशनाची वाचनीय पुस्तके :**

श्री. माधव जोशी यांच्या परममित्र प्रकाशनाने २६-५-०९ रोजी दादरच्या रवींद्र नाट्य मंदिराच्या संकुलात काही विशेष महत्त्वाची पुस्तके प्रकाशित केली. समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेचे माजी अध्यक्ष मनोहर जोशी होते. डॉ. बाळ फोंडके यांच्या हस्ते 'ध्यासपंथ' (ले. दिनेश गुणे; पृ. १२५, मूल्य - १२५; मुखपृष्ठ सतीश भावसार; विकासासंबंधीची प्रेरणा समाजामध्येच जागृत होऊन काही संस्था या दिशेने काम करतात. काही मंडळी कार्यकर्ते आपापल्या कल्पना शक्तीच्या कुवतीच्या आधारे स्वत:ला विकास कामात झोकून देतात. अशा काही निवडक कार्यकर्त्यांच्या गाथा या पुस्तकात आहेत) संतोष शिंत्रे ('अरुण्यरुदन' पृ. १०४, मूल्य रु. १००/-, मुखपृष्ठ सतीश भावसार; निसर्ग सौंदर्याच्या वर्णनापलीकडे जाऊन निसर्गावरचे ऐरणीवरचे प्रश्न मराठीत मांडले जायला अजून बराच वाव आहे. हे ऐरणीवरचे प्रश्न त्यांचे कंगोरे, बारकावे, विविध बाजू, आंतरराष्ट्रीय परिमाण हे सुजाण वाचकांपर्यंत मराठीत पोहोचविण्यासाठीचा हा प्रयत्न) अतिसूक्ष्म महाप्रचंड (ले. शैलेश माळोदे, पृ. २१०, मूल्य रु. २००/-, मुखपृष्ठ सुबोध पाध्ये; नजिकच्या दोनचार वर्षातच नॅनो टेक्नॉलॉजीचे आपले संपूर्ण आयुष्य बदलत जाणार आहे. अशा नॅनो टेक्नॉलॉजीवरील साद्यंत माहिती या पुस्तकांत आहे), '१४ महिने, १३ दिवस आणि ...' (ले. ज्ञानेश्वर भोसले, पृ. १८०, मूल्य रु. १७५/-, मुखपृष्ठ सुबोध पाध्ये; सोलापूरातील एका पारधी समाजातील तरुण. कायमची गुन्हेगारी शिक्का लागलेला समाज खुनाच्या गंभीर स्वरूपाच्या खोट्या आरोपाखालील ज्ञानेश्वर भोसले जेलमध्ये जातो. काही भल्या माणसांच्या प्रयत्नामुळे सुटतो. पारधी समाजाच्याच नव्हे तर सगळ्या भटक्या व विमुक्त समाजाच्या विकासासाठी झटू लागतो त्याची ही आत्मकथा.) 'विचारक्षितिजे' (ले. दीपक घारे, पृ. १६०, मूल्य रु. १५०/-, मुखपृष्ठ दीपक घारे) विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात नव्या विचारधारा मराठीत आल्या. सामाजिक विचार विज्ञान, भाषाशास्त्र अशा विविध ज्ञानशाखांमधून समाजवर्तनाचा शोध आणि विचारमंथन होऊ लागले. आजच्या वैचारिक जगतात घडणाऱ्या संकल्पना व्यूहांची ही झलक.

**ध्यासपंथ :**

दिनेश गुणे लिखित 'ध्यासपंथ' हे पुस्तक म्हणजे समाजासाठी झटणाऱ्या विविध व्यक्ती आणि संस्थांच्या कामाची गाथा आहे असे याप्रसंगी मनोहर जोशी म्हणाले, प्रत्येक माणूस हा स्वत:पुरता जगतो, तर काही जण कुटुंबासाठी जगतात, मात्र समाजात अशीही काही मंडळी असतात की जी समाजासाठी जगत असतात. गुणे यांच्या या पुस्तकात समाजातील वेगवेगळ्या घटकांसाठी जगणाऱ्या माणसांचे चित्रण करण्यात आले आहे. जो संवेदनाक्षम माणूस आहे, तोच सामाजिक कामाचा पंथ अनुसरू शकेल. या पुस्तकातून प्रेरणा घेऊन प्रत्येकाने किमान एकातरी कामात स्वत:ला गुंतवून घ्यावे.'

या प्रसंगी बोलतांना डॉ. फोंडके म्हणाले की, आज प्रकाशित सर्व पुस्तकांमध्ये वस्तुनिष्ठ निरीक्षण, चिकित्सक

विश्लेषण आणि संख्याशास्त्रीय विवेचन दिसून येते. आज आपल्या जीवनशैलीवर विज्ञान - तंत्रज्ञानाचा मोठा परिणाम झाला असून कोणत्याही तंत्रज्ञानाचा आपण चांगला उपयोग करून घेतला पाहिजे. तो कसा करून घ्यायचा हे जाणून घेण्यासाठी विज्ञान समजून घेतले पाहिजे.

**लेखकांची मनोगते :**

'अतिसूक्ष्म, महाप्रचंड' चे लेखक माळोदे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, 'नॅनो टेक्नॉलॉजी हा विषय युवकांसाठी आव्हानात्मक विषय आहे.' 'अरण्यरुदन' चे लेखक संतोष शिंत्रे म्हणाले, 'या पुस्तकामुळे आपल्या सर्वांना निसर्ग व पर्यावरण व त्याच्याशी निगडीत प्रश्नांकडे पाहण्याची मिळेत.' गुणे म्हणाले, 'विशिष्ट ध्येयाने आणि ध्यासाने समाजासाठी स्वार्थ विरहित काम करणाऱ्या व्यक्तींचा परिचय या पुस्तकात मी करून दिला आहे.' भोसले यांनी आपण फासेपारधी कुटुंबात जन्म घेतला असून आपल्या समाजासाठी आपण काय केले याची माहिती दिली.

इच्छुकांनी अधिक माहितीसाठी पुढील पत्त्यावर संपर्क साधावा -

**श्री. माधव जोशी**
परममित्र प्रकाशन, ६, 'राजदुर्गा',
बी केबिन रोड, नौपाडा, ठाणे - (प.) - ४०० ६०२.
दूरध्वनी - ०२२-२५४४७९४८;
मोबाईल - ९९६९४९६६३४;
ई मेल - param_mitra@yahoo.com.

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●

## पैशाने मिळणाऱ्या व न मिळणाऱ्या वस्तू

१) पैशाने मनोरंजन मिळेल पण - सुख मिळणार नाही.

२) पैशाने गाद्यागिरद्या मिळतील - पण झोप मिळणार नाही.

३) पैशाने पुस्तके मिळतील - पण बुद्धी मिळणार नाही.

४) पैशाने शिक्षण मिळेल - पण सज्जनता मिळणार नाही.

५) पैशाने अन्न मिळेल - पण भूक मिळणार नाही.

६) पैशाने घरे मिळतील - पण परिवार मिळणार नाही.

७) पैशाने ऐषाराम मिळेल - पण संस्कृती मिळणार नाही.

८) पैशाने औषधे घेता येतील - पण स्वास्थ्य मिळणार नाही.

९) पैशाने सुंदर देऊळ बांधाल - पण ईश्वर मिळणार नाही.

१०) पैशाने शस्त्र विकत घ्याल - पण त्यासाठी शौर्य मिळणार नाही.

आपण खूप वाचतो, लिहितो व इतर अनेक गोष्टी करतो. त्याला पैसा उपयोगी पडेल; पण त्या पैशाने मन:शांती, आत्मिक ज्ञान, परमेश्वर-प्राप्ती मिळणार नाही किंवा यासाठी पैशाचा यत्किंचितही उपयोग होणार नाही.

●●●

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*इतिहासाच्या दृष्टीने या व्यापक विषयाचा अभ्यास या लेखात मांडला आहे - संपादक*

**प्रास्ताविक :**

भारतीय संस्कृतीत इतिहास, साहित्य व कला यांना काही विवक्षित व्याख्या व आकार आणि रूपे आहेत. पाश्चात्य संस्कृतिपेक्षा ती निराळी आहेत. ह्या वेगळ्या स्वरूपाला विश्वाच्या निमिर्तीच्या उद्दिष्टांशी व व्यवहाराशी निगडीत असे काही पक्के किंवा '**सत्य संदर्भ**' आहेत. हे संबंध व नाती ही अशी एकत्रित लिखीत स्वरूपांत सांपडत नाहीत. हे खरे, पण ह्या विषयांच्या दर्शनी व व्यक्त स्वरूपांत, ती प्रयत्नपूर्वक उलगडून बघावी लागतात.

ही वैशिष्टचे व रहस्यात्मक संबध व नाती शोधण्यातच गुंतल्यावर आपल्याही 'जीवन, मृत्यूची व विश्वाच्या बीज स्वरूपाची गुढे उलगडतात. ही खरोखर फार गमतीची गोष्ट आहे.

'परोक्ष प्रिया देवा:' असे 'श्रृती' वचन आहे. देवाला, सरळ भाषेत, बोलणे रूचत नाही!! कां बरे असे, त्याने आपल्याशी 'क्रूर' व्हावे? कठीण गणिते सोडवताना लहानग्या विद्यार्थ्याला जसा शिक्षकाचा राग येतो ना!! तशीच काहीशी अवस्था आहे!!

पण, मी विचार केला कीं देवाचे वर्णन हे आसूरी, क्रूर, दूष्ट असे कधीच केले गेलेले नाही, तेव्हा कांहीतरी दुसरे कारण असलेच पाहिजे!!

**वैदिक उत्तर :**

माझ्या मते, ह्याचे उत्तर 'पुरुषसूक्तात' मिळेल. ज्या विश्वात आपण जन्मलो त्याच्या खऱ्या पूर्ण रूपाला आपण जाणलेच पाहिजे!! विश्वाचा १/४ भागच फक्त व्यक्त वा दृश्य स्वरूपांत आपल्या इंद्रियामार्फत अनुभवाला मिळतो. पण, विश्वाचा मोठा भाग जवळ जवळ ३/४ भागा इतका 'अव्यक्त' (unmanifest) स्वरूपात आहे. ह्याचा अर्थ 'अदृश्य' नव्हे. 'अव्यक्त म्हणजे फक्त कुठल्याही भौतिक, जड किंवा Material स्वरूपात अस्तित्वात असणार नाही. विश्वाच्या निर्मीतीसाठी सुद्धा निर्मात्याच्या '**संकल्प - शक्ति**' स्वरूपात सुरवात झाली. मग प्रत्येक संकल्पनेत इच्छाशक्तीच्या सामर्थ्याने 'बीज' निर्मिती झाली व त्या बीजातच अंगभूत स्वरूपातच त्या बीजाच्या अंकूरत्वाची, साधनाची, 'आधार रचना', वृद्धी संकल्पना व त्याच्या अस्तित्वाचा शेवट बांधून रचना झाली. पण, ह्या बीजाच्या अनंत काळच्या अस्तित्वाच्या सातत्याकरिता पुनर्निर्मीत 'नव बीजाची' निर्मीती संकल्पना सुद्धा सामावण्यात आली. आपण हे सत्य जीवनात पहातोच, मनुष्य, प्राणी, वनस्पती,



**खजुराहो मंदिर, देऊळ**

ग्रह, तारे एव्हढेंच काय पण स्थिर, जड वस्तु सुद्धा ह्या रहस्याने बांधले आहेत.

**विश्वाच्या निर्मीतीचा इतिहास कोणी लिहीला?**

मग ह्या बीजाच्या उत्पत्तीनंतर होणाऱ्या जीवन विस्तार व वृद्धी व क्षय यांच्या प्रकाराला काय म्हणून संबोधावयाचे? कोट्यावधी जीवात्म्यांच्या प्रवासाला प्राणी व वनस्पती जीवनाला सत्य अस्तित्व आहे किंवा नाही? मग त्याचा 'इतिहास' किती व कसा जपून ठेवावयाचा? कोणी लिहावयाचा? त्यांच्या भावनात्मक उलाढाली, खेळाचा इतिहास किती कथानके, नाटके, कविता, चित्रे, रंग तरंगामध्ये जपून ठेवावयाचा? रेकॉर्ड करावयाचा? (Archives) अर्किव्हज् मध्ये जतन करावयाचा? ह्याचा संकीर्ण विचार आज सुद्धा 'शहाणपणाने' होताना दिसत नाही. सर्वधर्म व विज्ञान शास्त्रे खऱ्या अर्थाने अनभिज्ञ आहेत. त्यांची तत्त्वे अर्धसत्य आहेत.!!

पण, ऋषी, मुनींनीं भारतात युगायुगांच्या व्यवहाराच्या अगोदरच हा प्रयत्न केला, असा दाट ग्रह होण्यास जागा आहे. जे सत्य त्यांना दिसते त्याला त्यांनी 'अपौरुषेय' अशी संज्ञा दिली. ह्याचा अर्थ 'मानवी दर्शनातील दोष' टाळले!!

**आजची इतिहासाची संकल्पना :**

ह्या संकल्पनेला एक ठाशीव रूप व आकार दिला आहे. थोर शिवाजीच्या काळात शाहीस्तेखानाची बोटे छाटली गेली, ही घटना सत्य मानल्यावर, उदाहरणार्थ, वाद घालावयाचा त्या वेळी तीन बोटे कीं चार बोटे छाटली गेली यावर. माझे मित्र एका प्रसिद्ध मराठी न्यूजपेपरचे संपादक आहेत. नुकतेच निवृत्त झाले. त्यांनी मला आपली व्यथा सांगितली. त्यांचा एक लेख लोकमान्य टिळकांवर लिहिला होता. पण त्याच्यातील एका वर्णनात लो. टिळक पायात जोडे की चपला घालून व छत्री घेऊन गेले यावर गंभीर वाद प्रसिद्ध इतिहास टीकाकार श्री. य. दि. फडके यांनी घातला होता, असे समजते. अतिशय क्षुल्लक महत्त्व असलेल्या या घटनेच्या 'ऐतिहासिक तथ्यावर' हा जोडे, छत्री व चपलांचा 'Evidence' पुरावा पुढे करण्यात आला. तेव्हा 'ऐतिहासिक सत्याला' असे जोडे व चपलाचे पुरावे प्रमाण म्हणून लागावे हे कशाचे लक्षण आहे?

**रामाचा जन्म, रामसेतू, सरस्वती देवता वा नदी, हजरतका बाल ह्या वरचे वाद काय दर्शवितात? :**

मर्त्य मानवी देह जीवनाच्या खऱ्या अस्तित्वालाच जिथे वैश्विक सत्यतेचा संदर्भ स्पष्ट नाही, तिथे एका शतकातील लहानशा क्षुल्लक घटनेच्या सत्यतेचा प्रश्न विचारवंतांना सतावतो, हे कशाचे द्योतक आहे? हा मर्त्य, जड बुद्धीच्या 'विचारवंतानी' केलेल्या मर्कट चेष्टा, वितंडवाद व पोरखेळ आहे असे कां म्हणू नये?

तेव्हा 'इतिहास' म्हणजे नक्की काय? तो कां जपायचा? कुणासाठी जपायचा? किती विषयांचा, गोष्टींचा इतिहास जपायचा? सत्याचा इतिहास कोण लिहू शकतो? सत्याचे प्रमाण काय?

**इतिहासाचे तत्त्वज्ञान :**

ह्या प्रश्नांची उत्तरे शोधायला 'Philosophy of Histoty' ह्या प्रांतात जावे लागते. पण, तिथेही मानवी जीवनाचे अस्तित्व व खुद्द ह्या विश्वाचे सत्य अस्तित्व ह्यांचे संदर्भ अभावितपणे डोकावतातच व टाळता येत नाहीत.

पण, ह्या जटील प्रश्नाच्या 'उत्तर-यात्रेत' निरनिराळ्या धर्मातील विश्वरचनेचे विश्वास व त्याच्या दूसऱ्या टोकाला 'ब्लॅक होल' Black Hole च्या गर्तेत सांपडलेल्या वैज्ञानिकांचे 'फंडामेंटॅलिझम' सुद्धा आड येते. त्यांना ठाम उत्तर सापडले नाही, पण त्यांच्या स्वतःच्या Methodology वर पूर्ण (अंध) विश्वास सुद्धा आहेच. पण, ह्या वैज्ञानिकांना पूर्ण सत्य प्राप्त होईपर्यंत अनेक शतके, युगे, मन्वंतरे वाट पहावी लागणार आहे. ह्या काळात शंका घेणारे व उत्तरे शोधणारे ही काळाच्या गर्तेत नाहीसे होणार आहेत. त्यामुळे,

हे 'इतिहासातील यक्ष प्रश्न' कोण सोडवणार व कुणाच्या आयुष्यात हा प्रकाश पडणार हा खरा प्रश्न आहे.

**माझा पेपर :**

मी एका सेमीनारमध्ये एक पेपर वाचणार आहे. हा सेमीनार 'इस्टिट्यूट ऑफ हिस्टॉरिकल स्टडीज' ह्या कोलकत्ताच्या संस्थेच्या वतीने विलेपार्ले येथे L.I.J.N. महिला विद्यालयाच्या वास्तूत होणार आहे. विषय आहे ''इतिहास व साहित्य किंवा साहित्यात इतिहास'' वगैरे.

त्या निमित्ताने दिशाच्या वाचकांकरितां, त्यांतील काही महत्त्वाचा भाग सांगणार आहे. आपल्या मुख्य विषयाला धरूनच. मी मांडणी करणार आहे. आपला विषय 'भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना' हाच आहे, मग त्या अनुषंगाने 'इतिहास व साहित्य' ह्या बद्दल आपल्या संस्कृतीत काय भूमिका आहेत? खरे म्हणजे ही सांगण्याची वेळ येऊ नये, पण पाश्चात्य संस्कृतीची समाजमनावर एव्हढी जबरदस्त पकड दिसते आहे, की ह्या विषयावर मुळापासून विचार करावयाला हवा आहे असे स्पष्ट दिसते.

**भारतीय इतिहास संकल्पना :**

भारतीय संस्कृतीमध्ये दोन ऐतिहासिक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. वाल्मिकी रामायण व महाभारत. रामायण ह्या ग्रंथाची तर अशी कथा आहे कीं नारद मुनींनी प्रत्यक्ष भगवानांच्या आदेशावरून महर्षि वाल्मिकीना भेट दिली व कुशल विचारले. ही घटना त्रेता युगांतील आहे.

महर्षी वाल्मिकींनी नारदमुनींना एक प्रश्न विचारला. ह्या प्रश्नाचे रूप व प्रयोजन महत्त्वाचे आहे म्हणूनच मी ते जास्त सविस्तरपणे सांगतो. हे वर्णन 'रामायण मीमांसा' ह्या स्वामी करपात्रीजी यांच्या ९७५ पानी प्रचंड ग्रंथातून घेतले आहे. हे 'श्री काशी विश्वनाथ प्रकाशन' आहे.

वाल्मिकी महर्षीने पूछा, ''देवर्षे, सम्प्रति इस मर्त्यलोक मे कौन गुणवान, वीर्यवान, धर्मज्ञ, कृतज्ञ, सत्यवक्ता, दृढवती, अनिन्द्य सर्वस्पहणीय चरित्रोसे सम्पन्न, प्रजारंजनसमर्थ, सकल जीवों के हितैषी, महान विद्वान, कामदेव से भी अधिक सुंदर, स्वाधीनमता, क्रोधदिविहिन, जिनकी देहकान्ति को देखने के लिए सकल प्राणी उत्कंठित हो, रणांगण मे क्रुद्ध होनेपर जिनके सम्मुख देवता भी न ठहर सकें ऐसा कौन पुरुष है? उसे जानने का मुझे बडा कुतुहल हो रहा है। हे देवर्ष, आज ऐसे पुरुषरत्न को जानने में नितरा सक्षम है।''

नारदमुनींनी मग संपूर्ण 'रामगुण' सांगणारे म्हणजेच 'संक्षित्प रामचरित्र' प्रसन्नतापूर्वक सांगितले.

**काय ह्या प्रसंगाचे महत्त्व? :**

एकतर त्रेतायुगाच्या पूर्वीही हे 'चरित्र' घडलेले आहे. वाल्मिकी महर्षिंच्या कुतूहल प्रश्नाचे उत्तर आहे. त्यांत 'मर्त्यलोकांतील' आदर्श पुरुषाचे 'चरित्र' कसे घडले ते सांगितले आहे.

मग हे ऐकताना 'आदर्श पुरुषाच्या' गुणांचे काय काय पदर असू शकतात ते ह्या रामराजाचे चरित्र या निमीत्ताने 'इतिहासाच्या कथनातून' प्रसृत झाले. पण, हा इतिहास


राम खरंच जन्मला काय?

हिंदूंनो, पुरावे द्या!

हिंदूंना त्यांच्या श्रद्धास्थानांचे नेहमीच पुरावे द्यावे लागतात. मुसलमान आणि ख्रिश्चनांच्या बाबतीत कोणी पुरावे मागत नाहीत. 'रामसेतु'प्रकरणी रामायणावरच शंका घेण्याचा नादानपणा केला. हजरतबलमधील पैगंबराचा 'बाल' खरा, मात्र रामसेतू खोटा. हा काय पांचटपणा आहे? रामसेतू बांधणारा राम कोणत्या इंजिनीयरिंग कॉलेजात शिकला? असे विचारणारे करुणानिधी केंद्र सरकार चालवितात. यापेक्षा हिंदूंचा मोठा अपमान कोणता?

नव्हे, राम जन्मालाच आला होता काय यावर संशय आहे!!

मानवी सांस्कृतिक इतिहासांत आपण अशा एका टप्प्यावर येऊन ठाकलो आहोत की पार्लमेंटचे मेंबर, राजसत्तेचे अधिकारी, सुप्रिम कोर्टाचे न्यायाधिश, सैन्याचे अधिकारी यांच्या भ्रष्टाचाराच्या कथा रोज वर्तमान पत्रात वाचत असतो. ह्या वर्तमानाशी त्रेतायुगांतील किंवा त्याच्याही पूर्वकाळांत जगलेल्या राजांच्या गुणांचे काय 'चित्र' काढले आहे किंवा 'घडले' आहे, ह्याचे एक वर्णन आपल्याला दिसते आहे. ते इतके दूरचे वाटते की, असा माणूस ह्या मर्त्यलोकांत असूच शकणार नाही, असा दाट विचार सहजच मनात यावा. तसाच तो सध्याच्या न्यायसंस्थेच्या न्यायाधिशांना, वकीलांना पडला असावा व त्यांनी रामाचा जन्म अयोध्येला काय पण पृथ्वीतलावर कुठेंच होणे अशक्यप्राय आहे, असा निवाडा दिला, तर वावगे काय?

**'पुरुषोत्तमाची' स्वभाव व गुण लक्षणे कोणती? :**

विष्णुसहस्रनामातही अशाच गुणांचे चित्र आहे आणि ते रोज स्नानाच्या वेळी किंवा पुजेच्या वेळी म्हणण्याचा प्रघात आहे. मग हा काय शुष्क इतिहास आहे? या गुण आदर्शांचे व 'पुरुषांचे' विस्मरण इतके झाले आहे व इतक्या झपाट्याने ते खालावते आहे की अफझलखान, चंगीझखान, हिटलर, माओत्से तंग, स्टालीन, बाबर, तैमुरलंग, औरंगजेब ह्यांचीच चरित्रे आदर्श म्हणून आजच्या शिक्षणक्रमांतील पुस्तकांत शासन लावूं शकेल. ही वेळ फारच झपाट्याने येऊ लागली आहे.

मग, अशा वेळी – अशा घसरत व नैतिक गर्तेत जाणाऱ्या काळात मानवी संस्कृतीने कुठल्या '**मापदंडाने**' नैतिक व दैवी आदर्शाच्या खुणा पुढच्या प्रत्येक पिढीला अवगत करून द्याव्या?

**भारतीय संस्कृतीने हा प्रश्न अशा 'एका दैवी योजनेने' सोडवला आहे की या 'रामचरिताला अनंत काळचे अस्तित्व' चिरंतन 'इतिहास' म्हणून मिळवून दिले आहे.**

**युगायुगातील, पिढ्यापिढ्यातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, नैतिक स्थित्यंतरात हे ''चरित्र'' अजुनही मानवी स्मृतींत का अजून जिवंत आहे?**

ह्याचे वर्णन मी करण्यापेक्षा ह्या '**रामायण मीमांसा**' मधील '**एकादश अध्याय व द्वादश अध्याय**' याची अनुक्रमणिकाच मी इथे उद्‌धृत करतो. म्हणजे मला भाष्य करण्याचे प्रयोजनच उरणार नाही.

**एकादश अध्याय :**

आधुनिक भारतीय भाषाओं में रामकथा
द्राविड़ भाषाओं के साहित्य में रामकथा
तमिलरामायण में रामकथा
तेलुगुरामायण में रामकथा
मलयालम में रामचरितसाहित्य
कन्नड़रामायण में रामकथासाहित्य
आदिवासियों में प्रचलित रामकथाएँ
नेपालीसाहित्य में रामकथा
सिंहलीरामकथा
काश्मीरीरामायण में रामकथाविस्तार
असमीयासाहित्य में रामकथा
बङ्गालीसाहित्य में वर्णित रामकथा
उड़ियांसाहित्य में वर्णित रामकथा
हिन्दीसाहित्य में वर्णित रामकथा
गोस्वामी तुलसीदास वर्णित हिन्दीसाहित्य में रामकथा
तुलसीभिन्न हिन्दीसाहित्य में वर्णित रामकथा
मराठीसाहित्य में रामकथा
सीतास्वयंवर
गुजरातीसाहित्य में रामकथा
उर्दू तथा फारसीसाहित्य में वर्णित रामकथा

**द्वादश अध्याय :**

विदेशी रामकथा की चर्चा
तिब्बती रामायण
खोतानी रामायण
हिन्देशिया की प्राचीनतम रामकथा
हिन्देशिया की अर्वाचीत रामकथा
मलयन की अर्वाचीत रामकथा
जावा की अर्वाचीन रामकथा
हिकायत सेरीराम में वर्णित रामकथा
पातानी रामायण
जावा के सेरतकाण्ड को रामकथा
हिन्दचीन, श्याम, ब्रह्मदेश की रामकथा
हिन्दचीन के रूमेरसाहित्य की सर्वाधिक कलात्मक रचना
रामकेर्ति मे रामकथा
श्यामदेश के रामकियेन की विस्तृत रामकथा
ब्रह्मदेश का रामकथासाहित्य
पाश्चात्य वृत्तान्त –
पाश्चात्य यात्रियों तथा निशनरियों की भारतसम्बन्धी रचनाओं में रामकथा
रशियन भाषा में रामकथा

त्यामुळे, इतिहास ह्या सध्याच्या जगातील संकल्पनेत अशाच गोष्टीचा समावेश होऊ शकतो कीं ज्याला 'सत्यते'चे प्रमाण लागू पडेल.

पण, मग 'सत्याची' व्याख्या कोणती? ह्या 'सत्यदर्शनाचा' लाभ घेणारा इतिहासकार हा मर्त्य माणूसच आहे ना? त्याच्या स्वत:च्या अस्तित्वाचे सत्य काय? त्याचे दर्शन जर केवळ 'इंद्रिय गोचर' ज्ञानाचाच भाग असेल तर त्याचे दर्शन दोषरहित, पूर्वग्रहदोषरहित असे असल्याचे पुरावे तपासले गेले आहेत कां? समजा टॉयनबी किंवा टॉमस रो ह्यासारखे आधुनिक इतिहासाकार किंवा आपल्याकडील कै. राजवाडे यांसारखे 'सत्यकथन' करणारे किंवा इतर Marxist Historians धर्मानंद कोसंबी व डॉ. देवीप्रसाद चट्टोपाध्याय (लोकायतकार) आळंदीला ज्ञानेश्वराच्या 'संजीवनी समाधीच्या' 'ऐतिहासिक' की स्पिरीच्युअल? प्रसंगी हजर असते, तर त्यांनी ह्या गूढ 'स्पिरीच्यूअल समाधी घटनेचे' काय वृत्त कथन केले असते? मग, काय असे समजावयाचे की त्या थोर नाथसंप्रदायी योग्याचा स्वनिर्मित इहलोकाचा प्रवास संदर्भ संपवण्याची '**स्वयंभू क्रिया**', हा एक '**बायॉलॉजिकल डेथ**' होता व तेव्हढेंच सत्य पुढच्या पिढीला सांगण्याच्या लायकीचे आहे? ज्ञान ह्याचा एक अर्थ 'मृत्यूचे निवारण आहे ह्या 'गूढ सत्य अर्थापर्यंत' मानवजात जावयाला इतिहास कथन त्या लायकीचे असावयाला हवे.

**पाश्चात्य इतिहास संकल्पना तोकडी व एकांगी :**

इतिहास संकल्पनेला मानवी संस्कृतीतील उच्च स्तरावरील कॉंशसनेसच्या प्रवासाला बिलकुल उपयोगी न पडणाऱ्या अश्या रूपाला झुगारूनच द्यावे लागेल.

इतिहास, इतिहास कथन, इतिहास 'प्रमाणे' व इतिहास लेखनाचा व जतन करण्याच्या उद्दिष्टांच्या नव्या व्याख्या कराव्या लागतील. त्यांतील विश्वाचे मॉडेल, मानवाचे मॉडेल, समाजाचे मॉडेल, सांस्कृतिक उद्दिष्टे यांची फेर तपासणी व मांडणी करावी लागेल.

ह्या विषयात जास्त सविस्तर व खोलवर विचार आपण दिशाच्या पुढच्या काही अंकात जरूर करू या.

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी – २५३६८४५०
मोबाईल – ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

# परिसर वार्ता

## सौ. ए. के. जोशी इंग्रजी माध्यम शाळा

**❋ गणित संबोध परीक्षा २००९ :**

| इ. | श्रेणी | | | |
|---|---|---|---|---|
| | विशेष योग्यता | प्रथम वर्ग | द्वितीय वर्ग | उत्तीर्ण |
| ५ वी | २ | ८ | १९ | ९ |
| ८ वी | ० | ३ | ९ | ६ |

**सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :**

इ. ५ वी – कु. श्रीहरी बोडस – ९० गुण

इ. ५ वी – कु. शुभम पाटेकर – ९० गुण

इ. ८ वी – कु. तेजस गोखले – ८४ गुण

❖ १६ वर्षाखालील मुलांच्या आंतरशालेय बास्केटबॉल स्पर्धेत आमच्या शाळेतील खालील विद्यार्थ्यांनी अंतिम सामना जिंकला. कु. मेघना बेलसरे, कु. प्रथमेश नामजोशी, कु. प्रणव मोघे, कु. अक्षय आळसकर, कु. ओजस कोलवणकर, कु. माहिर सालियन, कु. पुष्कर ओक, कु. कौस्तुभ ढमाले.

❖ जिज्ञासा ट्रस्ट आयोजित जिल्हास्तरीय पथनाट्य स्पर्धेत आमच्या शाळेने भाग घेतला व पर्यावरण गणपती उत्सव यात तृतीय पारितोषिक पटकावले.

❖ १७ वर्षाखालील मुलांमध्ये अनिकेत करंदीकर याने आणि १४ वर्षाखालील मुलींमध्ये नेहा दीक्षित हिने आंतरशलेय वैयक्तिक बॅडमिंटन स्पर्धा जिंकली आणि विभागीय स्तर स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली.

**❋ ज्ञान – विज्ञान प्रतिभा परीक्षा २००८ – २००९ :**

द्वितीय परीक्षा निकाल, परीक्षेला बसलेले विद्यार्थी ३, उर्त्तीण झालेले विद्यार्थी २.

**❋ राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा २००९ :**

इ. ९ वी तील प्राची जयस्वाल या विद्यार्थिनीस राष्ट्रीय प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती मिळाली.

❖ लायन्स क्लब आयोजित वक्तृत्व स्पर्धेत आमच्या शाळेला मराठी भाषणात द्वितीय क्रमांक मिळाला तसेच उपविजेता चषक मिळाला. खालील विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. १. कु. अमेय गांगल २. कु. सुश्रुत ठोसर ३. कु. जान्हवी दोषी.

❖ इ. ६ वी तील सिद्धेश पांडे ह्याने जळगांव येथे झालेल्या राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत वैयक्तिक गटात सुवर्णपदक मिळवले. तो महाराष्ट्र संघात प्रथम आला. नागपूर येथे २००९ साली झालेल्या स्पर्धेतही तो उपविजेता ठरला.

## विद्या प्रसारक मंडळ

**❋ नवीन कार्यालय :**

नौपाडा परिसरातील डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या तळ मजल्यावर विद्या प्रसारक मंडळाचे कार्यालय आहे. अलीकडेच त्याचे नूतनीकरण करण्याचे काम पूर्ण झाले. दि. १६ ऑगस्ट २००९ रोजी मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते नवीन सोयींनी युक्त अशा या कार्यालयाचे उद्घाटन झाले. सदर कार्यालयाची रचना वास्तुविशारद श्री. वसंतराव पानसरे यांच्या आराखड्यानुसार करण्यात आली आहे. कार्यालयाचे बांधकाम पर्यवेक्षण



**मंडळाच्या नूतनीकरण झालेल्या कार्यालयाचे उद्घाटन करताना माननीय कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर**



**मंडळाच्या नूतनीकरण झालेल्या कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. आण्णासाहेब तथा श्री. वि. करंदीकर**

श्री. दिनेशभाई व श्री. चंदुभाई ठक्कर यांच्या मार्गदर्शनाखाली झाले आहे. सर्व आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर हे कार्यालयाचे वैशिष्ट्य ठरावे. उद्घाटन प्रसंगी मंडळाच्या कार्यकारिणीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

### ❋ जागतिक संस्कृत परिषद :

१४ व्या जागतिक संस्कृत परिषदेचे आयोजन जपान मध्ये १ ते ५ सप्टेंबर २००९ या दरम्यान क्योटो येथे करण्यात आले. संस्कृत अभ्यास आंतरराष्ट्रीय संघटना व क्योटो विद्यापीठाच्या ग्रॅज्युएट स्कूल ऑफ लेटर्स यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद क्योटो विद्यापीठात आयोजित करण्यात आली. दिशाचे संपादक व विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष, ठाण्याच्या प्राच्य विद्या अभ्यास संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर सदर परिषदेस उपस्थित होते.

सदर परिषदेचे आयोजन पुढील १५ विभागांमध्ये करण्यात आले होते. या विभागांची नावे –

१. वेद २. भाषाशास्त्र ३. महाकाव्ये व पुराणे ४. आगम व तंत्रे ५. व्याकरण ६. काव्य, नाट्य व सौंदर्यशास्त्र ७. संस्कृत, प्रादेशिक भाषा व साहित्य ८. वैज्ञानिक साहित्य ९. बुद्ध अभ्यास १०. जैन अभ्यास ११. तत्त्वज्ञान १२. धर्माचा इतिहास १३. कर्मविषयक अभ्यास १४. इतिहास, शिलालेख व कला १५. कायदा व समाज

### ❋ महान वैज्ञानिक :

'महान वैज्ञानिक' हे अनुवादित पुस्तक अलिकडेच आले. ग्रेट सायंटिस्ट (इंग्रजी), महान वैज्ञानिक (हिंदी) या पुस्तकांच्या आधारे दिशाचे कार्यकारी संपादक मोहन पाठक यांनी हा अनुवाद केला आहे. प्रसिद्ध अशा नवनीत प्रकाशन संस्थेने सदर अनुवाद प्रकाशित केला आहे. या पुस्तकात भारतीय व परदेशीय अशा ६३ विख्यात शास्त्रज्ञांच्या जीवन व कार्याचा परिचय करून देण्यास आला आहे. शालेय तसेच कनिष्ठ, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सदर ग्रंथ उपयुक्त आहे.

### ❋ दीक्षान्त समारंभ :

विद्या प्रसारक मंडळाचा ६ वा दीक्षान्त समारंभ प्रतिवर्षीप्रमाणे ५ सप्टेंबर २००९ रोजी, म्हणजेच शिक्षकदिनी पारंपरिक पद्धतीने संपन्न झाला. पुणे विद्यापीठाच्या माहिती व तंत्रज्ञान संकुलाचे वरिष्ठ सल्लागार, पुणे विद्यापीठाचे माजी उपकुलगुरु, विद्यापीठ अनुदान




**दीक्षान्त समारंभ – ५ सप्टेंबर २००९**
**व्यासपीठावर : डावीकडून – श्री. अुत्तम जोशी, डॉ. अरुण निगवेकर व श्री. मा. य. गोखले**

आयोगाचे माजी कार्यवाह डॉ. अरुण निगवेकर याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. समारंभाचे अध्यक्षस्थान मंडळाचे कार्यवाह व ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. अुत्तम जोशी यांनी भूषविले होते.

सामाजिक शास्त्रात पदवी घेणारांत आज एक प्रकारचा न्यूनगंड आढळतो. परंतु असे वाटण्याचे कारण नाही. कारण समाजाची सांस्कृतिक प्रगती उत्तम कवी, समाजशास्त्रज्ञ यांच्याच कार्यातून होत असते, असे विचार डॉ. निगवेकर यांनी यावेळी बोलताना काढले. जागतिकीकरण व वैश्विकरणातील सूक्ष्म फरक याबाबतही त्यांनी मौलिक विचार यावेळी मांडले. ''आज शिक्षक आणि समाज, शिक्षक आणि विद्यार्थी यांत मोठी दरी निर्माण झाल्याचे जाणवत आहे. शिक्षकांनी 'आचार्य' होण्याचा प्रयत्न केल्यास ही दरी दूर होईल' असे त्यांनी सांगितले. याबाबत आचार्य विनोबा भावे यांच्या विचारांचा उल्लेखही त्यांनी केला. माहितीचे रूपांतर अनुभव व ज्ञानात होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

सरस्वती वंदनाने व दीप प्रज्ज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या समारंभात संस्थेच्या वतीने



**यशस्वी विद्यार्थ्यास प्रमाणपत्र देताना डॉ. अरुण निगवेकर**

राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमातील यशस्वी विद्यार्थ्यांना दीक्षान्त प्रमाणपत्रे व शपथ देण्यात आली. कार्यक्रमास मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कला वाणिज्य महाविद्यालयाचा प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला सिंग यांनी केले.

**आंतरसांस्कृतिक शिक्षण प्रणाली प्रमाणपत्र अभ्यासक्रम :**

संस्कृतीचा शालेय शिक्षणावर परिणाम होतो का? या प्रश्नाचे उत्तर चिकित्सा केल्यानंतर होय असे द्यावे लागेल. काय शिकवावे, तसेच अभ्यासक्रम, वर्गातील शिक्षक-विद्यार्थी संबंध या सर्वांवर सामाजिक व सांस्कृतिक घटकांचा निश्चितच प्रभाव असतो.

सध्याच्या जागतिककरणाच्या युगात एका विशिष्ट सामाजिक व सांस्कृतिक वातावरण वाढलेल्या व शिक्षण घेतलेल्या व्यक्तिला आपला देश सोडून अतिशय भिन्न सामाजिक व सांस्कृतिक वातावरण असलेल्या देशात विद्यार्जनाचे काम करावे लागते. त्याचप्रमाणे शिक्षकांना विविध सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना शिकवावे लागते. परदेशातील शिक्षकांसाठीची वाढती

मागणी व वेगाने होणारे सामाजिक बदल यामुळे भारतीय महानगरातील शिक्षकांना पाश्चिमात्य शिक्षण संस्कृती जाणून घेण्याची व पाश्चिमात्यांना भारतीय शिक्षण संस्कृतीचे आकलन होण्याची आवश्यकता जाणवते.

काळाची ही गरज लक्षात घेऊन ठाण्यातील प्राच्य विद्या संस्थेने लंडन स्थित विद्या प्रसारक मंडळाच्या 'लंडन ॲकॅडमी ऑफ एज्युकेशन ॲण्ड रिसर्च' या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आंतरसांस्कृतिक शिक्षण प्रणाली प्रमाणपत्र या अभ्यासक्रमाची सुरुवात करण्याचा निर्णय घेतला आहे.

सदर अभ्यासक्रमाचा तपशील खालीलप्रमाणे असेल.

१) वाचन सत्र २) प्रकल्प ३) संपर्क सत्र ४) परराष्ट्रांना (प्रामुख्याने इंग्लडला) भेट. परदेश भेटी दरम्यान खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल. अ) आंतरशिक्षण शिक्षण प्रणालीवर चर्चासत्रांचे आयोजन ब) इंग्लडमधील शिक्षण निरिक्षक, शिक्षक व विद्यार्थ्यांशी चर्चा व वैचारिक देवाण-घेवाण क) इंग्लडमधील महत्त्वाच्या वस्तुसंग्रहालयांना व ग्रंथालयांना भेटी ख) लंडनमधील भारतीय क्रांतीकारकांशी संबंधीत स्थळांना भेटी.

**परीक्षेचे स्वरूप :**

लेखी परीक्षा, प्रकल्प व गट चर्चा या तीन टप्प्यात ही परीक्षा घेतली जाईल. या परीक्षेचे एकूण गुण ५०० असतिल. या अभ्यासक्रमाच्या पहिल्या तुकडीची सुरुवात १ जानेवारी २०१० रोजी होणार असून ह्या अभ्यासक्रमाचा कालावधी ६ महिन्यांचा असेल. या अभ्यासक्रमाची एकूण फी १,३०,००० रु. असेल यामध्ये १२ दिवसाच्या परदेश दौऱ्याचा विमान प्रवास, स्थानिक प्रवास, जेवण व राहण्याचा खर्चाचा समावेश असेल.

या अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या शिक्षण क्षेत्रातील व्यक्तिंनी (शिक्षक, प्राध्यापक, ग्रंथपाल, शिक्षण संस्था प्रतिनिधी व संचालक) आपले अर्ज विहित नमुन्यात भरून ३१ ऑक्टोबर २००९ पूर्वी विद्या प्रसारक मंडळ कार्यालयात आणून द्यावेत.

अधिक माहितीसाठी विद्या प्रसारक मंडळाचे संकेत स्थळ www.vpmthane.org ला भेट द्या.

**विद्या प्रसारक मंडळाच्या लंडन शाखेची परिषद :**

लंडन येथील विद्या प्रसारक मंडळाच्या 'लंडन ॲकेडेमी ऑफ एज्युकेशन ॲंड रीसर्च' या शाखेतर्फे लंडन विद्यापीठाच्या ब्रुनई सभागृहात दि. २७ ऑक्टोबर रोजी कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सीबीलिटी (सीएसआर) अर्ध दिवसीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. फ्रॉड मॅनेजमेंट कंट्रोल या विषयावरील या परिषदेचे बीज भाषण डॉ. गौतम सेन यांचे असून, त्यांच्या भाषणाने परिषदेचे उद्घाटन होईल. परिषदेची वेळ सायंकाळी ५.३० ते रात्रौ १०.०० अशी आहे. इच्छुकांनी http://www.vpmthane.org/londonseminar.hom या संकेत स्थळावरून अधिक माहिती प्राप्त करावी असे आवाहन ॲकेडेमीचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी केले आहे.

विद्या प्रसारक मंडळाची लंडन येथील सदर ॲकेडेमी २६ मे २००९ रोजी कार्यान्वित झाली. त्या दिवशी झालेल्या परिषदेस अर्थ जगतातील अभ्यासकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला होता.

• • •

मुखपृष्ठावरून
संपादकीय
अंधार यात्रेच्या दिशेने

दिसून येत नाहीत. याला अपवाद असतीलही, पण ते 'परिस्थिती निराशाजनक बनवणे' या नियमाचे अस्तित्व सिद्ध करण्यापुरते. आज विजेपासून शेतीपर्यंत सर्वच क्षेत्रांत कमालीची दुर्दशा आहे. याचे कारण सवंग लोकप्रियतेचा हव्यास असणारे, दूरदृष्टीचा थांगपत्ता नसणारे व नियोजन शून्य नेतृत्व निवडून येण्याची निर्माण झालेली परंपरा हे आहे.

कायद्याचे तर इतके मोठे जंजाळ झाले आहे की, त्यामुळे प्रत्येक नागरिक पावलोगणिक कोणता ना कोणता कायदा मोडत असतो. अनैसर्गिक, अव्यवहार्य अशा उदंड कायद्यांमुळे भ्रष्टाचार हाताबाहेर बोकाळला आहे. या भ्रष्टाचाराची मिळेल ती संधी साधणारे निवडणुकांतही उभे राहतात आणि समाजसेवेचे क्षेत्र राजकारणग्रस्त करून टाकतात. निवडणूक प्रक्रियेचा एक भाग म्हणून उमेदवाराला त्याची मालमत्ता जाहीर करण्याचे बंधन आहे. कुठलाही सनदशीर व्यवसाय न करता या सर्व उमेदवारांची मालमत्ता मात्र कोटी कोटींच्या घरात आहे. एखाद्या उद्योजकाला अनेक वर्षे व्यवसाय करूनही जितकी संपत्ती जमवता येणार नाही. त्याहून अधिक संपत्ती ५ ते १० वर्षांच्या काळात लोकप्रतिनिधींकडे जमा झालेली दिसते. अर्थात गरीबांच्या सेवेचा मंत्र जपण्याचे काम तोंडाने सुरू असते.

आजपर्यंत अशिक्षितांच्या नावे खडे फोडून आपल्या अयशस्वी लोकशाहीचे खापर खेडुत व अशिक्षित लोकांवर फोडले जाई. मुंबई, पुणे, औरंगाबाद, दिल्ली, कोलकत्ता, बंगळूर अशा शहरांतील लोक अशिक्षित आहेत असे म्हणण्याचे धाडस कोणी करील असे वाटत नाही. सर्व भ्रष्टाचारी मंत्री, सनदी अधिकारी हे चांगले शिक्षित आहेत. यांची बाजू घेऊन न्यायालयांत लढे देणारे वकीलही शिक्षित आहेत, त्याचप्रमाणे चित्रवाणी, वृत्तपत्रे यांचे संपादक, वृत्तप्रतिनिधी हे देखील शिक्षितच आहेत. अर्थतज्ज्ञांना कळणार नाही एवढा आर्थिक व्यवहार यांना समजतो असे असूनही या अनागोंदीचे खापर आपण अशिक्षितांच्या माथी फोडतो.

लोकशाही यशस्वी करायची असेल तर तिचा प्रमुख घटक, म्हणजे नागरिक हा सुजाण सुसंस्कृत व जबाबदार हवा. कोणतीही अक्षर ओळख नसताना देखील ही मूल्ये निर्माण होऊ शकतात. घरात वडीलधाऱ्या मंडळींकडून व घरात सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रांतील नेतृत्वाकडून या मूल्यांचे संक्रमण होत असते. आज घरादारातील या आघाड्यांवर दिवाळखोरीच प्रत्ययास येत आहे. इतक्या संवेदना बधिर झालेल्या समाजाकडून कोणत्या बदलाची अपेक्षा करायची? या महिन्यातील निवडणुकीच्या निकालानंतर 'कालचा गोंधळ बरा होता' असे म्हणण्याची पाळी आपल्यावर येणार आहे. स्वार्थपरायण आणि सवलतग्रस्त अशा आजच्या समाजात लोकशाहीच काय, कोणतीही संस्था चांगली असू शकत नाही.

यात बदल झालाच तर दोन मार्गांनी होऊ शकतो. एक मार्ग म्हणजे क्रांती व दुसरा आत्मपरीक्षण. खरा निर्णय या पर्यायांचाच आहे. आजच्या घडीला यातील कोणताच पर्याय निवडला जात नाही, हे आपले दुर्दैव आहे. दुसरे काय?

(याच विचारांवर आधारित 'दिशा' च्या जानेवारी १९९७ च्या अंकातील 'शपथग्रहण की शपथेला ग्रहण' हे संपादकीय वाचकांनी आवर्जून वाचावे अशी विनंती आहे.)

**डॉ. विजय बेडेकर**

●●●

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे–४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.